






# नवा मराठा


संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. ३०.०७.२०२६ | अंक नं. १०३ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020













## देशभरातील नागरिकांच्या ऑनलाईन फसवणुकीचे 'नगर कनेक्शन' उघड

### नगरच्या सायबर पोलिसांत अज्ञात बँक खातेदारांवर गुन्हा दाखल

नगर –देशभरातील नागरिकांची ऑनलाइन फसवणूक करून लुटलेला पैसा अहिल्यानगर जिल्ह्यातील अज्ञात बँक खातेदार व त्यांच्या साथीदारांनी परस्पर काढून घेतल्याचा खळबळजनक प्रकार उघडकीस आला आहे. याप्रकरणी सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस अंमलदार सोमनाथ सटवाजी आठरे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून सायबर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, सायबर गुन्हेगारांनी देशभरातील विविध नागरिकांना जाळ्यात ओढून त्यांची तब्बल ६ लाख ९९ हजार ८०० रुपयांची फसवणूक केली होती. ही फसवणुकीची रक्कम सायबर गुन्हेगारांच्या सांगण्यावरून अहिल्यानगर जिल्ह्यातील काही स्थानिक मध्यस्थ व अज्ञात बँक खातेदारांच्या खात्यात जमा झाली होती.

अहिल्यानगर जिल्ह्यातील या बँक खातेदारांनी व खाते हाताळणाऱ्या इसमांनी ही रक्कम स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी तात्काळ धनादेश (चेक) व एटीएमद्वारे रोख स्वरूपात काढून घेतली. यावरून हे स्थानिक बँक खातेदार आणि मुख्य सायबर गुन्हेगार यांनी आपसात संगनमत करून कट रचल्याचे स्पष्ट दिसून येत आहे.

या प्रकरणी पोलीस अंमलदार सोमनाथ आठरे यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा नंबर ३१/२०२६ अंतर्गत अज्ञात बँक खातेदार, खाते हाताळणारे इसम आणि मुख्य सायबर गुन्हेगारांविरुद्ध संघटितपणे फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सायबर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली या आंतरराज्यीय गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

## स्क्रॅप देण्याच्या बहाण्याने ७ लाख २६ हजारांची ऑनलाईन फसवणूक

नगर– भंगाराचा स्क्रॅप माल देण्याचे आमिष दाखवून एका व्यापाऱ्याची तब्बल ७ लाख २६ हजार २२९ रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दोघांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, नवनागापूर येथील रहिवासी आणि भंगार व्यावसायिक भाऊसाहेब रखमा गुंजाळ (वय ५७) यांना आरोपी सुरेश जाधव (रा. पुणे) आणि प्रसाद शंकर गांगुर्डे (रा. चांदवड, जि. नाशिक) यांनी स्क्रॅप माल देतो असे सांगितले. दोघांनी संगनमत करून गुंजाळ यांचा विश्वास संपादन केला. त्यानंतर आरोपी सुरेश जाधव याने प्रसाद गांगुर्डे याच्या बँक खात्यावर पैसे पाठवण्यास सांगितले.

व्यापारी गुंजाळ यांनी आरोपींच्या सांगण्यावरून त्यांच्या बँक खात्यावर ७,२६,२२९ रुपये ऑनलाईन ट्रान्सफर केले. मात्र, पैसे मिळूनही आरोपींनी कोणताही भंगार किंवा स्क्रॅप माल दिला नाही. तसेच घेतलेली रक्कमही परत न करता व्यापाऱ्याचा विश्वासघात केला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्यानंतर भाऊसाहेब गुंजाळ यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून पोलिसांनी आरोपी सुरेश जाधव आणि प्रसाद गांगुर्डे यांच्याविरोधात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमांनुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक मनोज मोंढे करत आहेत.

## फसवणुकीच्या गुन्ह्यातील फरार डॉक्टरला चार वर्षानंतर अटक

नगर – कोतवाली पोलीस स्टेशनमध्ये दाखल असलेल्या फसवणुकीच्या गुन्ह्यातील २०२२ पासून फरार असलेला मुख्य आरोपी अखेर पोलिसांच्या जाळ्यात अडकला आहे. फिर्यादी रामराव त्र्यंबक ढोणे (रा. माळवाडा, पुणोद) यांनी १२ सप्टेंबर २०२२ रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपींनी नगर-पुणे महामार्गावरील केडगाव शिवारात 'सुविधा मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल'मध्ये लॅब सुरु करण्याच्या बहाण्याने त्यांच्याकडून ६ लाख रुपयांचा चेक आणि ४ लाख रुपये रोख असे एकूण १० लाख रुपये घेतले होते. तसेच ५ वर्षांचा करारनामा करूनही हॉस्पिटल अचानक बंद केले आणि लॅबमधील ६ लाख ५६ हजार ५०० रुपये किमतीच्या वस्तू व डिपॉझिटची रक्कम परत न करता फिर्यादीची फसवणूक केली होती. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

या गुन्ह्यातील आरोपी डॉ. रामेश्वर विठ्ठलराव बंडगर (रा. सोयगाव, ता. उमरखेड, जि. यवतमाळ) हा घटनेपासून फरार होता. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या 'फरार आरोपी शोध मोहीमेअंतर्गत', सदर आरोपी २७ जुलै रोजी अहिल्यानगर येथे येणार असल्याची माहिती कोतवाली पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे कोतवाली पोलीस स्टेशनच्या पथकातील अंमलदार राहुल शिंदे, दौंड, सुरज कदम, सचिन लोळगे, संकेत धिवर आणि अतुल लाटे यांनी सापळा रचून आरोपीला शिताफीने अटक केली.

ही कारवाई पोलीस अधीक्षक मुमक्का सुदर्शन, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबमे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक नितीन देशमूख, सपोनि. कुणाल संकपाळ, पोलीस उपनिरीक्षक गणेश देशमुख आणि कोतवाली पोलीस स्टेशनच्या पथकाने केली.



फसवणुकीच्या गुन्ह्यातील आरोपीसमवेत कोतवाली पोलिस.





फलेक्स प्रिंटींग
9403232323






जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन-२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. - कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# अकोळनेर-खडकी रस्त्यावर लुटमार, तीन चोरट्यांनी दागिने पळविले

नगर - अकोळनेर ते खडकी जाणाऱ्या रस्त्यावर सायंकाळच्या सुमारास लुटमारीची एक धक्कादायक घटना घडली आहे. रस्त्याने जात असताना तीन अनोळखी इसमांनी अचानक गाठून ४६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने बळजबरीने हिसकावून नेले. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, खडकी येथील रहिवासी किशोर नामदेव कोठूळे (वय ५०) हे दिनांक २८ जुलै रोजी सायंकाळी ५:३० वाजेच्या सुमारास अकोळनेर ते खडकी रस्त्यावरून जात होते. त्यावेळी रस्त्यालगत अचानक आलेल्या तीन अनोळखी इसमांनी त्यांना गाठले आणि जबरदस्तीने त्यांच्याकडील सोन्याचे दागिने हिसकावून पोबारा केला. या लुटमारीमध्ये चोरट्यांनी १ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कुडके, ३ ग्रॅम वजनाचे टॉप्स, ४ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत आणि २ ग्रॅम वजनाची कर्णफुले असा एकूण ११ ग्रॅम वजनाचा आणि ४६ हजार रुपये किमतीचा ऐवज बळजबरीने लांबवला.

या प्रकरणी किशोर कोठूळे यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून तीन अनोळखी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९ (४) प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास नगर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक धुमाळ हे करत असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

# महापालिकेचा प्रारूप सुधारित विकास आराखडा सादर; शहरात ४१९.९२ हेक्टर क्षेत्रावर ५१९ आरक्षणे प्रस्तावित

नगर - महापालिकेचा प्रारूप सुधारित विकास आराखडा महापौर ज्योती गाडे यांच्याकडे सादर करण्यात आला असून, शहरातील ४१९.९२ हेक्टर क्षेत्रावर ५१९ आरक्षणे प्रस्तावित करण्यात आली आहेत. पुढील २० वर्षांची लोकसंख्या गृहित धरुन हा प्रारुप आराखडा तयार करण्यात आला आहे. यापूर्वी २०११ साली हा आराखडा सादर करण्यात आल्याचे सांगण्यात आले.



महापौरांकडे प्रारुप आराखडा सादर करताना नगर विकास विभागाच्या उपसंचालक मुल्ला. यावेळी उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव आदी.

महापालिकेचा प्रारुप सुधारित विकास आराखडा सादर करण्यासाठी बोलावलेल्या सर्वसाधारण सभेत नगरविकास विभागाच्या उपसंचालक मुल्ला यांनी महापौर ज्योती गाडे यांच्याकडे हा आराखडा सादर केला. यावेळी उपमहापौर अ‍ॅड. धनंजय जाधव, अतिरिक्त आयुक्त नागेंद्र मुतकेकर, नगरसचिव मेहेर लहारे यांच्यासह नगरसेवकांची उपस्थिती होती.

सभेत नगरसेवक डॉ. सागर बोरुडे यांनी माजी आ. स्व. अरुणकाका जगताप यांचे शहरात स्मारक व पूर्णाकृती पुतळा उभारण्याची मागणी केली. त्यास कुमार वाकळे यांनी अनुमोदन दिले. त्यावर महापौर गाडे यांनी स्मारक समिती नियुक्त करुन हा विषय मार्गी लावण्याचे आश्वासन दिले. त्यानंतर मुल्ला यांनी सादर केलेल्या आराखड्याबाबत प्रास्ताविकात माहिती सांगितली.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम २६(१) अन्वये हा आराखडा तयार करण्यात आला आहे. प्रस्तावित भूवापरात मूळ हद्द आणि वाढीव हद्द यांचा समावेश आहे. या नियोजनासाठी २०२९ सालची अंदाजे ६ लाख ४८ हजार आणि २०४९ सालची अंदाजे ८ लाख १० हजार लोकसंख्या गृहीत धरण्यात आली आहे. शहराचे एकूण विकसीत क्षेत्र ६ हजार ८०९.१ हेक्टर असून, अविकसनशील क्षेत्र ७२७.१३ हेक्टर असल्याचे सांगण्यात आले. त्यानुसार शहराचे प्रस्तावित आरक्षण टाकण्यात आले आहे. हे आरक्षण टाकताना पूर्वीचे आरक्षण तसेच ठेवण्यात आले असून, नवीन क्षेत्रावर हे आरक्षण टाकण्यात आले आहे.

या प्रारूप विकास आराखड्यानुसार ३ हजार ९२६.३४ हेक्टरवर निवासी वापर असून, १,२८१.४७ हेक्टर क्षेत्र वाहतूक व दळणवळणाने व्यापले आहे. या प्रारुप आराखड्यात एकूण ५१९ आरक्षणे असून ती एकूण ४१९.९२ हेक्टर क्षेत्र व्यापतात. यामध्ये खेळाची मैदाने ९४, उद्यान / बाग ९०, भाजी मार्केट / शॉपिंग सेंटर / मार्केटसाठी ६९, शैक्षणिक सुविधेसाठी ४२, इतर (सार्वजनिक / निमसार्वजनिक) बेघरांसाठी घरे, झोपडपट्टी पुनर्वसन इत्यासाठी ४२, महापालिका प्रयोजनासाठी ३९, आरोग्य सुविधेसाठी ३३, पार्किंगसाठी ३३, ग्रंथालयासाठी १२, समुदाय / बहुउद्देशीय सभागृहांसाठी ११, स्मशानभूमीसाठी १०, कब्रस्तानसाठी ८, घनकचरा व्यवस्थापनासाठी ८, एएमटी बस स्थानक/ चार्जिंग स्टेशनसाठी ७, अग्निशन केंद्रासाठी ४, मलनिस्सारण प्रक्रिया केंद्रासाठी ४, टाऊन हॉलसाठी ३, जल उपसा केंद्रासाठी २ अशी आरक्षणे प्रस्तावित करण्यात आली आहे.



राजहंस लर्निंग डेव्हलपमेंट अँड मल्टीथेरपी सेंटर फॉर चिल्ड्रेन यांच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त बालदिंडी काढण्यात आली.

# आषाढी एकादशीनिमित्त विशेष मुलांची दिंडी; भक्तिगीतावर नृत्य सादरीकरणाने वेधले लक्ष

नगर - मनस्फूर्ती प्रतिष्ठान संचलित मी राजहंस लर्निंग डेव्हलपमेंट अँड मल्टीथेरपी सेंटर फॉर चिल्ड्रेन यांच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त विशेष मुलांची विशेष दिंडी या कार्यक्रमाचे उत्साहपूर्ण आयोजन करण्यात आले. विशेष मुलांची दिंडी तसेच विठू माऊलीच्या भक्तिगीतावर विशेष मुलांनी सादर केलेले नृत्य हे कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले.

कार्यक्रमाला बाल मेंदू विकार तज्ज्ञ डॉ. सुनील साबळे, बाल हृदयरोग तज्ज्ञ डॉ. रचना साबळे, ज्येष्ठ बालरोगतज्ज्ञ डॉ. अनिल कुऱ्हाडे, नगरसेवक ऋग्वेद गंधे, माजी मुख्याध्यापिका कुलकर्णी, तसेच लोखंडे, उद्योजक नरवडे, उद्योजक अमोल घोलप, तसेच रेणुका माता मंदिराचे विश्वस्त मधुसूदन मुळे यांची प्रमुख उपस्थिती होती.

मान्यवरांनी विद्यार्थी व पालकांना मार्गदर्शन करताना विशेष मुलांच्या सर्वांगीण विकासासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित केले. तसेच सेंटरच्या सेवाभावी कार्याचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी संस्थेच्या संचालिका तेजस्विनी आहेर, अध्यक्ष डॉ. मधुकर काळे, उपाध्यक्ष संतोष आहेर आणि सदस्य प्रशांत जोशी यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# एसा नॉलेज सिरीजमध्ये रेंटल यिल्ड, सोलॅटियम आणि व्यवसाय वृद्धी विषयावर मार्गदर्शन

नगर - आर्किटेक्ट, इंजिनिअर्स अँड सर्व्हेअर्स असोसिएशन (एसा) अहिल्यानगर आणि पोलाद स्टील, जालना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एसा नॉलेज सिरीज अंतर्गत संस्थेचे ज्येष्ठ सभासद अविनाश कुलकर्णी यांचे रेंटल यिल्डचे गुंतवणुकीतील महत्त्व, सोलॅटियमचे जमीन गुंतवणुकीतील महत्त्व आणि बांधकाम व्यवसाय अधिक सक्षम करण्यासाठी पूरक बाबी या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. कार्यक्रमाचे सहप्रायोजक पोलाद स्टील होते.

यावेळी मार्गदर्शन करताना अविनाश कुलकर्णी यांनी आजच्या स्पर्धात्मक युगात कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी केवळ अनुभव पुरेसा नसून, सखोल ज्ञान, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर आणि बदलत्या परिस्थितीनुसार स्वतःला विकसित करण्याची तयारी आवश्यक असल्याचे सांगितले. व्यवसाय अधिक सक्षम, फायदेशीर आणि शाश्वत करण्यासाठी योग्य गुंतवणूक, कायदेशीर माहिती आणि आधुनिक कार्यपद्धतींचा अवलंब करणे काळाची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.



अविनाश कुलकर्णी

व्याख्यानामध्ये त्यांनी तीन महत्त्वाच्या विषयांवर सविस्तर मार्गदर्शन केले. रेंटल यिल्ड आणि प्रिसिएशन यिल्ड या विषयावर बोलताना त्यांनी मालमत्तेमध्ये गुंतवणूक करताना केवळ मालमत्तेच्या किमतीत होणारी वाढ (प्रिसिएशन) न पाहता, त्यातून मिळणारे नियमित भाडे उत्पन्न (रेंटल यिल्ड) देखील तितकेच महत्त्वाचे असल्याचे सांगितले. गुंतवणूकदारांनी आर्थिक परताव्याचा सर्वांगीण विचार करून निर्णय घ्यावा, अशी सूचना त्यांनी केली.

सोलॅटियम इन लँड क्विझिशन या विषयावर त्यांनी जमीन संपादन प्रक्रियेदरम्यान मिळणाऱ्या भरपाईतील सोलॅटियम म्हणजे काय, त्याचे स्वरूप, त्याचा लाभ कसा मिळतो आणि जमीनधारकांचे कायदेशीर हक्क कोणते आहेत, याविषयी सविस्तर माहिती दिली.

तसेच बांधकाम व्यवसाय अधिक सक्षम करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा स्वीकार, नवीन व्यक्तींशी व्यावसायिक संपर्क वाढविणे, बदलत्या बाजारपेठेनुसार कार्यपद्धतीत सुधारणा करणे आणि सातत्याने कौशल्यविकास करणे आवश्यक असल्याचे सांगत विविध उपयुक्त टिप्स त्यांनी उपस्थितांना दिल्या.

वरील तिन्ही विषयांचा थेट संबंध व्यवसाय, गुंतवणूक आणि आर्थिक हिताशी असून, या विषयांचे योग्य ज्ञान प्रत्येक व्यावसायिकासाठी अत्यंत महत्त्वाचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष अभिजित देवी यांनी सध्याच्या स्पर्धात्मक युगात नवीन ज्ञान आत्मसात करून त्याचा उपयोग स्वतः च्या विकासासाठी आणि व्यावसायिक प्रगतीसाठी करणे आवश्यक असल्याचे सांगितले. पोलाद नॉलेज सिरीज ही सभासदांना अद्ययावत ज्ञान मिळवून देण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावत असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमास पोलाद स्टीलचे सुशांत गव्हाणे, आदेश गुंगे, एसा उपाध्यक्ष प्रदीप तांदळे, सचिव भूषण पांडव, सुनील औटी, संतोष खांडेकर, संजय चांडवले, सुनील जाधव, सचिन डागा, रत्नाकर कुलकर्णी, अन्वर शेख, सुरेश परदेशी, आदिनाथ दहिफळे तसेच संस्थेचे सभासद उपस्थित होते. सूत्रसंचालन गौरव मांडगे यांनी केले. अनमोल जैन यांनी आभार मानले.

# सारडा महाविद्यालयात ११ वीच्या नवागत विद्यार्थ्यांचे स्वागत

नगर - पेमराज सारडा महाविद्यालयात इयत्ता ११वी मध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ उत्साहात झाला. या स्वागत समारंभानिमित्त म हाविद्यालयात प्रवेश घेतलेल्या गुणवंत तसेच ऑलंपीयाड स्पर्धेत पदक पटकावलेल्या विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन विशेष सत्कार करणात आला.



गुणवंत तसेच ऑलंपीयाड स्पर्धेत पदक पटकावलेल्या विद्यार्थ्यांना भेटवस्तू देऊन सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमास हिंद सेवा मंडळाचे मानद सचिव संजय जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या कार्यक्रमास संस्थेचे कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, कनिष्ठ महाविद्यालयाचे चेअरमन मधुसूदन सारडा, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा व ब्रिजलाल सारडा, माजी चेअरमन डॉ. पारस कोठारी, प्राचार्य डॉ. माहेश्वरी गावित आदी उपस्थित होते. महाविद्यालयाच्या निसर्गरम्य गार्डनमध्ये झालेल्या या सोहळ्यात सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उत्साहात सहभागी झाले होते. गुरुपौर्णिमेनिमित्त महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकांचाही सन्मान करण्यात आला.

संजय जोशी म्हणाले, शालेय शिक्षण संपून आता विद्यार्थ्यांच्या महाविद्यालयीन जीवनास सुरवात झाली आहे. विद्यार्थ्यांनी ११ वी व १२ वी मध्ये भरपूर मेहनत घेत अभ्यास करावा. हा अत्यंत महत्वाचा टप्पा असून येथूनच खऱ्या अर्थाने विद्यार्थ्यांच्या करियरला सुरवात होते असल्याने हे वर्ष गांभीर्याने घ्यावे. सारडा महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक तुम्हास उत्तमप्रकारे ज्ञानदान करण्यास सज्ज आहेत.

मधुसूदन सारडा म्हणाले, ध्येय प्राप्त होईपर्यंत थांबू नका; हे स्वामी विवेकानंद यांचे वाक्य कायम लक्षात ठेवा. खूप मोठी स्वप्न पहा व ती पूर्ण होण्यासाठी जिद्द चिकाटीने भरपूर मेहनत घ्या, असे आवाहन केले.

सुमतीलाल कोठारी म्हणाले, सारडा महाविद्यालय सर्व अद्ययावत भौतिक सुविधांनी सुसज्ज आहे. तसेच सर्व उच्चविद्याविभूषित सर्व प्राध्यापक तुम्हाला अभ्यासा बरोबरच कला, क्रीडा, सांस्कृतिक अशा सर्वच क्षेत्रांमध्ये करियर करण्यासाठी योग्य मार्गदर्शन करणार असल्याने या सुवर्णसंधीचा लाभ घ्या,

ब्रिजलाल सारडा यांनी भगवदगीतेचा दाखला देत सांगितले, गुरु हे कायम आपल्याला मार्ग दाखवून प्रोत्साहन देत असतात. त्यामुळे गुरुंनी दाखवलेल्या मार्गावर पुढे गेल्यास आपले ध्येय निश्चितच प्राप्त होईल. अजित बोरा व डॉ.पारस कोठारी यांनीही मार्गदर्शन केले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित यांनी केले. कार्यक्रमाचे स्वागत उपप्राचार्य प्रा.गिरीश पाखरे यांनी केले. प्रा.प्रसाद बेडेकर यांनी सूत्रसंचालन केले. पर्यवेक्षक प्रा.सुजित कुमावत यांनी आभार मानले.



केडगाव येथील सरस्वती विद्यालयात पालक सभेचे उद्घाटन करताना डॉ. प्रसाद उबाळे, डॉ. रवींद्र चोभे, डॉ. गोकुळदास लोखंडे, डॉ. राजेश परदेशी, श्रीपाद शिंदीकर, कैलास चोथे आदी.

# केडगावच्या सरस्वती विद्यालयात पालक सभा संपन्न

नगर - केडगाव येथील सरस्वती विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मधील पहिली पालक सभा उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाली. या सभेला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून आयुर्वेदाचार्य डॉ. प्रसाद उबाळे हे होते, तर अध्यक्षस्थानी डॉ. हेडगेवार शिक्षण संस्थेचे सहकार्यवाह डॉ. रवींद्र चोभे उपस्थित होते. यावेळी संस्था समन्वयक डॉ. गोकुळदास लोखंडे, आरोग्य भारतीचे डॉ. राजेश परदेशी, श्रीपाद शिंदीकर, कैलास चोथे आणि सामाजिक कार्यकर्ते अनिल झिरपे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

प्रास्ताविकात विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप भोर यांनी सांगितले की, शाळा आणि पालक यांच्यातील समन्वय विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगितले. यंदाच्या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. बदलत्या काळानुसार विद्यालयात कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित अध्यापनाला प्राधान्य देण्यात आले असून विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच मंथन प्रज्ञाशोध, शिष्यवृत्ती परीक्षा, स्कॉलरशिप, इंडियन नॅशनल ऑलिम्पियाड, नवोदय प्रवेश परीक्षा, विविध स्पर्धा परीक्षा यांच्या माध्यमातून विद्यालयाचा गुणवत्ता आलेख अधिक उंचावण्यासाठी पालकांनीही सहकार्य करावे, असे आवाहन त्यांनी केले.

प्रमुख अतिथी आयुर्वेदाचार्य डॉ. प्रसाद उबाळे यांनी आपल्या मार्गदर्शनात पालकांची भूमिका ही मुलांच्या भविष्यासाठी अत्यंत महत्त्वाची असल्याचे सांगितले. मुलांची नियमित दिनचर्या, संतुलित व पौष्टिक आहार, चांगले संस्कार, शिस्तबद्ध जीवनशैली आणि सकारात्मक कौटुंबिक वातावरण यांचा त्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासावर मोठा प्रभाव पडतो,विद्यार्थ्यांनी केवळ गुणांच्या स्पर्धेत न अडकता आपल्या आवडीनुसार करिअरची दिशा निवडावी, त्यासाठी पालकांनी मुलांशी सातत्याने संवाद साधून त्यांना योग्य मार्गदर्शन करावे, असेही त्यांनी सांगितले.

अध्यक्षीय भाषणात डॉ. रवींद्र चोभे यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षणाबरोबरच मैदानी खेळ, व्यायाम, संस्कार आणि महिला सक्षमीकरणाची जाणीव महत्त्वाची असल्याचे प्रतिपादन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्मिता खिलारी यांनी केले, मुख्याध्यापक संदीप भोर यांनी आभार मानले.

# अकोळनेर-खडकी रस्त्यावर लुटमार

नगर - अकोळनेर ते खडकी जाणाऱ्या रस्त्यावर सायंकाळच्या सुमारास लुटमारीची एक धक्कादायक घटना घडली आहे. रस्त्याने जात असताना तीन अनोळखी इसमांनी अचानक गाठून ४६ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने बळजबरीने हिसकावून नेले.

मिळालेल्या माहितीनुसार, खडकी येथील रहिवासी किशोर नामदेव कोठूळे (वय ५०) हे दिनांक २८ जुलै रोजी सायंकाळी ५:३० वाजेच्या सुमारास अकोळनेर ते खडकी रस्त्यावरून जात होते. त्यावेळी रस्त्यालगत अचानक आलेल्या तीन अनोळखी इसमांनी त्यांना गाठले आणि जबरदस्तीने त्यांच्याकडील सोन्याचे दागिने हिसकावून पोबारा केला. या लुटमारीमध्ये चोरट्यांनी १ ग्रॅम वजनाचे सोन्याचे कुडके, ३ ग्रॅम वजनाचे टॉप्स, ४ ग्रॅम वजनाची सोन्याची पोत आणि २ ग्रॅम वजनाची कर्णफुले असा एकूण ११ ग्रॅम वजनाचा आणि ४६ हजार रुपये किमतीचा ऐवज बळजबरीने लांबवला.

या प्रकरणी किशोर कोठूळे यांनी नगर तालुका पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून तीन अनोळखी आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या कलम ३०९ (४) प्रमाणे गुन्हा नोंदवण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास नगर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक धुमाळ हे करत असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

## नरेंद्र मालपाणी यांचे दु:खद निधन

नगर - नरेंद्र केदारनाथ मालपाणी (वय ६३) यांचे ३० जुलै रोजी दु:खद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर संगमनेर अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. स्व. डॉ. आर. के. मालपाणी यांचे ते बंधू, डॉ. केतन, अनूप मालपाणी यांचे ते काका, शुभम मालपाणी यांचे ते वडील होत.

## राजेंद्र गुगळे यांचे अल्प आजाराने निधन

नगर - माणिकनगर येथील रहिवासी राजेंद्र मिश्रीलाल गुगळे (वय ६५) यांचे २९ जुलै रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे २ मुले, सुना, नातवंडे, पत्नी, भाऊ, भावजया असा परिवार आहे. मयुर व रोहित यांचे ते वडील तर चंपालाल गुगळे यांचे पुतणे, संजय, मनोज, विजय, अजित, महेश गुगळे (चांदावाला) यांचे ते बंधू होत.





गुरुपौर्णिमेनिमित्त एबीव्हीपीने शहरातील विविध महाविद्यालयांना भेट देऊन प्राचार्य, प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शुभेच्छा दिल्या.

# गुरुपौर्णिमेनिमित्त अभाविपकडून ३०० हून अधिक प्राध्यापकांचा गौरव

नगर - अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप) अहिल्यानगर महानगर शाखेच्या वतीने गुरुपौर्णिमेनिमित्त शहरातील विविध महाविद्यालयांना भेट देऊन प्राचार्य, प्राध्यापक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना शुभेच्छा देत त्यांच्या कार्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. या उपक्रमांतर्गत शहरातील ३०० हून अधिक प्राध्यापकांना गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

भारतीय संस्कृतीत गुरु-शिष्य परंपरेला अनन्यसाधारण महत्त्व असून गुरुचे स्थान सर्वोच्च मानले जाते. ज्ञान, शील आणि एकता या त्रिसूत्रीच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना घडविण्याचे कार्य शिक्षक करत असतात. विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाबरोबरच राष्ट्रनिर्मितीतही शिक्षकांचे योगदान महत्त्वपूर्ण असल्याची भावना यावेळी अभाविपच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

यावेळी अभाविपच्या कार्यकर्त्यांनी विविध महाविद्यालयांमध्ये जाऊन शिक्षकांना शुभेच्छापत्र देत गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. तसेच शिक्षकांशी शैक्षणिक विषय, विद्यार्थीहिताचे प्रश्न आणि परिसरातील विविध उपक्रमांबाबत संवाद साधण्यात आला. या उपक्रमात अखिल भारतीय विद्यार्थी परिषद, अहिल्यानगर महानगर शाखेचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले.



ल. ना. होशिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात संस्थेच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना जिल्हा व सत्र न्यायाधीश सत्यवान डोके.

# ध्येय मोठे ठेवा, नियोजनबद्ध मेहनत करा; यश तुमच्या पावलांशी येईल

**जिल्हा व सत्र न्यायाधीश सत्यवान डोके यांचे प्रतिपादन**

जामखेड – दि पिपल्स एज्युकेशन सोसायटीच्या ल. ना. होशिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात संस्थेच्या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित उच्चपदस्थ माजी विद्यार्थी मनोगत या विशेष कार्यक्रमात जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा विद्यालयाचे माजी विद्यार्थी सत्यवान डोके यांनी विद्यार्थ्यांशी मनमोकळा संवाद साधत यशस्वी जीवनासाठी प्रेरणादायी मार्गदर्शन केले.

यावेळी विद्यालयाच्या वतीने न्यायाधीश सत्यवान डोके यांचा शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला. कार्यक्रमास माजी प्राचार्य अनंता खेत्रे, माजी विद्यार्थी नासीर पठाण, प्राचार्य बी. ए. पारखे, स्वाती देशमुख, उपमुख्याध्यापक अनिल देडे, पर्यवेक्षक सुदाम वराट यांची प्रमुख उपस्थिती होती.

मार्गदर्शन करताना न्यायाधीश सत्यवान डोके म्हणाले, आम्हाला ऐकण्याची सवय असते. न्यायाधीश म्हणून आम्ही दररोज आठ तास लोकांचे म्हणणे ऐकण्याचे काम करतो. मी स्वतः एका शिक्षकांच्या आणि एकाच वर्गाच्या छोट्या शाळेत शिक्षण घेतले. सुरुवातीला पाच वर्षे वकिली केली. त्यानंतर लग्न झाल्यावर एमपीएससी परीक्षा दिली आणि त्यातून पुढील वाटचाल घडली. त्यामुळे परीक्षा देण्यासाठी कोणतेही वय अडथळा नसते. योग्य ध्येय, नियोजन, जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रम यांच्या जोरावर कोणतेही यश मिळवता येते.

ते पुढे म्हणाले, कोणतीही गोष्ट अवघड नसते. मोठे ध्येय ठेवा आणि ते पूर्ण करण्यासाठी सातत्याने प्रयत्न करा. आज मोबाईलचा अतिवापर विद्यार्थ्यांच्या स्मरणशक्तीवर परिणाम करत आहे. अभ्यास, वाचन आणि चिंतन यांना प्राधान्य दिल्यास स्मरणशक्ती वाढते. जगात कोणतीही गोष्ट अशक्य नाही. स्पर्धेला घाबरू नका. प्रत्येक विद्यार्थ्याकडे काही ना काही वेगळे कौशल्य असते. त्या कौशल्याला योग्य दिशा दिली तर यश निश्चित मिळते.

प्राचार्य बी. ए. पारखे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, जीवनात दिशा निश्चित करून सातत्याने प्रयत्न केले तर यश निश्चित मिळते. प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या ध्येयावर लक्ष केंद्रित करून परिश्रम करण्याची तयारी ठेवली पाहिजे.

संस्थेचे अध्यक्ष उद्धवबापू देशमुख, सचिव अरुणशेठ चिंतामणी, उपाध्यक्ष दिलीप गुगळे, सहसचिव डॉ. सुनील कटारिया, खजिनदार शरद देशमुख, माजी सचिव शशिकांत देशमुख तसेच माजी खजिनदार राजेश मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रेरणादायी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.

यावेळी प्राचार्य बी. ए. पारखे, उपप्राचार्य युवराज भोसले, उपमुख्याध्यापक अनिल देडे, पर्यवेक्षक सुदाम वराट, पोपट जगदाळे, नरेंद्र डहाळे, राघवेंद्र धनलगडे, विशाल पोले, किशोर कुलकर्णी, रोहित घोडस्वार, उमाकांत कुलकर्णी, मुकुंद राऊत, हनुमंत वराट, कैलास वराट, स्वप्निल जाधव, बापू जरे, विजय क्षीरसागर, बाबासाहेब समुद्र, गणेश नेटके, साई भोसले, स्वप्नाली घाडगे, आर. एस. कारंडे, एस. बी. हंगे, एम. जे. जाधव, एल. एम. सोळंकी, एस. बी. दराडे, एस. वाय. घायतडक, एस. डी. जगदाळे, पी. बी. भालेराव, एस. व्ही. भोंडवे, व्ही. एस. अल्हाट, प्रियंका सुपेकर, लंघे (पी.टी.) यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पर्यवेक्षक सुदाम वराट यांनी केले, तर उपस्थितांचे आभार उपमुख्याध्यापक अनिल देडे यांनी मानले.

विद्यार्थ्यांनी न्यायाधीश सत्यवान डोके यांच्या प्रेरणादायी अनुभवांना उत्स्फूर्त प्रतिसाद देत त्यांच्या मार्गदर्शनाचा लाभ घेतला.

# प्रेरणादायी अक्षरधन

## भ्रष्टाचार संपवायला हवा

"मुसाफिर"

संकलन: दिशान फिचर्स




यजुर्वेद म्हणतो,
बलायोपसदां पृथवक्कुरु ।

तुला सामर्थ्य हवं ना, मग कशाला व्यर्थ इतर धडपड करतोस? तुझ्यातल्या स्वार्थी, कपटी, लाचखाउ प्रवृत्तींना दूर कर ना । असे, समाजाचे व देशाचेही असेच आहे. लाचलुचपतखोर व भ्रष्टाचारी लोकांना दुर केले पाहिजे. भ्रष्टाचारी लोक संपवले पाहिजेत. त्याशिवाय देश सामर्थ्यवान होणार नाही.

अशनाया हि मृत्यूः।

भूक न भागली तर स्वत:चा मृत्यू. पण धनाची भूक न भागली तर माणूस घडवतो दुसऱ्याचा मृत्यू । अन्न नसले तर शरीर खंगते, अन्नासाठी ते तडफडते. म्हणून अन्न द्यावे अन्न घ्यावे. धनाबाबत मात्र उदासीन रहावे. त्याचे घेणे देणे सगळ्यांच्याच जिवावर बेतते. अन्नाची भूक अन्न मिळाल्याने वाढते अन्न घेणारा कृतज्ञ असतो, पण धन घेणारी मात्र कृतघ्। अन्नासाठी माणूस बनतो फार तर भिकारी। समर्थ रामदास स्वामी म्हणतात,

चोरही हेरटी धुंदे। नासकै लाच इच्छिती लौंडीचे दुर घालावे। मारावं राजकारणे ।

जनसेवक व राजकारणी चोर निघतात. सत्ता व संपत्ती मिळताच लाचलुचपत स्वीकारु लागतात. मग सगळे जनजीवन नासते. प्रजेचे अहित होते. सामान्य लोकांचे जीवन दुर्धर होते. भ्रष्टाचार हा न बरा होणारा आजार। भ्रष्टाचारींना संपवणे, हाच भ्रष्टाचार संपवण्याचा उपाय आहे. म्हणून समर्थ रामदास म्हणतात, अशांना वाळीत टाकावे, नव्हे, कटकारस्थाने करुनही चालेल, पण अशांना मारावे.

लोकांचे हित पाहणे हीच सेवकांची खरी कृती. पण त्यांच्यात शिरते विकृती आणि मग सगळ्याच समाजाची बिघडते प्रकृती भगवद्गीताही म्हणते, आततायिनं हन्यात । दुष्ट, दुचाचारी व आपल्याच बांधवांचे काळ होणारे अविचारी लोक अपराधीच. ठारच केले पाहिजे त्यांना. काम करण्याऐवी केवळ दाम वसूल करण्याचीच विकृती लवकर जडते. कृती कठीण असते. विकृती तितकीच सुलभ। वृक्षारोपणासारख्या उपक्रमाला मुले मिळत नाहीत. वृक्षारोपण सप्ताहाची कृतीदेखील कशा विकृताव्थेला येते, हे मी अनुभवलेय.

एका कार्यालयात वृक्षारोपण कार्यक्रमाला मी लागोपाठ दोन वर्षे गेली. रोप लावण्याचा खड्डा पाहिला. गतवर्षीही तोच खड्डा होता. मी विचारले, साहेब, मला वाटतं गतवर्षीदेखील हाच खड्डा होता. यातच मी रोप लावलं होतं.

साहेब म्हणाले, अगदी बरोबर. दर वर्षी पावसाळ्यात वृक्षारोपण कार्यक्रम करावा लागणार तेव्हा हा एक खड्डा कायमचा करुन ठेवलाय वृक्षारोपणासाठीच मुद्दाम। कार्यक्रम वृक्षारोपणाचा आहे. वृक्षरक्षणाचा नाही। वर्षभर रोपाची देखभाल करणाऱ्या माळ्याचा पगार आणि खतपाण्यासाठी लागणारा खर्च मात्र साहेबांच्याच खिशात जातो, असं ऐकलं ।

अशा भ्रष्टाचारांना शासनाने आवरले पाहिजे. अन्यथा ते शासन टिकणार नाही. असा गंभीर इशारा स्वामी समर्थ रामदास देतात.

सेवका आवरु नेणे।
तो राजा मुर्ख जाणिजे
मूर्खाचे राज्य राहे ना ।।

– किशोर गांधी

# ॲड.चेतना डुंगरवाल यांचे उद्योजकांना कायदेशीर मार्गदर्शन



नगर – जैन आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना प्रोफेशनल फोरम, अहिल्यानगर चॅप्टरच्या वतीने नुकताच नगरमध्ये अर्थ ७ येथे प्रोटेक्ट व्हॉट यू बिल्ड या विषयावर उद्योजकांसाठी विशेष कायदेशीर मार्गदर्शन सत्राचे आयोजन करण्यात आले होते. या सत्राला स्थानिक उद्योजकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या कार्यक्रमासाठी द लीगल लॅबच्या संस्थापक ॲड. चेतना ओस्तवाल–डुंगरवाल प्रमुख वक्त्या म्हणून उपस्थित होत्या. ॲड. चेतना या वांबोरी येथील उद्योजक राजकुमार ओस्तवाल यांच्या कन्या असून त्यांनी आतापर्यंत ४५० हून अधिक ट्रेडमार्क नोंदणी, चित्रपटांच्या स्क्रिप्टचे कॉपीराइट तसेच नामांकित कलाकारांचे व्यावसायिक करार यशस्वीरीत्या हाताळले आहेत. आपल्या मार्गदर्शनात ॲड. चेतना यांनी ट्रेडमार्क, पेटंट, कॉपीराइट नियम, व्यावसायिक करार आणि कायदेशीर अनुपालन या विषयांवर विविध उदाहरणांसह सखोल आणि सोप्या भाषेत माहिती दिली. व्यवसायाची उभारणी करतानाच बौद्धिक संपदेचे रक्षण करणे किती महत्त्वाचे आहे, हे त्यांनी अधोरेखित केले. कार्यक्रमास जितोचे चेअरमन आलोक मुनोत, चीफ सेक्रेटरी तुषार कर्नावट आणि अजय मुथा यांच्यासह अनेक मान्यवर व व्यावसायिक उपस्थित होते. सत्रातील माहितीमुळे उद्योजकांना आपल्या व्यवसायातील कायदेशीर बाबी समजून घेण्यास मोठी मदत झाली. अशा प्रकारच्या मार्गदर्शनपर कार्यक्रमांचे आयोजन नियमितपणे केले जावे, अशी अपेक्षा उपस्थितांनी व्यक्त केली.

# सेंट विवेकानंद प्रायमरी स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात

नगर – सिंधी एज्युकेशन सोसायटी संचलित सेंट विवेकानंद प्रायमरी स्कूल येथे गुरुपौर्णिमेचा उत्सव अत्यंत भक्तिभाव, उत्साह आणि आनंदी वातावरणात साजरा करण्यात आला. भारतीय संस्कृतीतील गुरु–शिष्य परंपरेचे महत्त्व विद्यार्थ्यांच्या मनावर बिंबविण्यासाठी इयत्ता पहिली व दुसरीच्या विद्यार्थ्यांतर्फे मुख्याध्यापिका कांचन पापडेजा व शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.



सेंट विवेकानंद प्रायमरी स्कूलमध्ये गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित पालक, शिक्षक यांचे स्वागत व गुरु वंदनेने झाली. यावेळी शाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात गुरुजनांप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

यानंतर शर्वरी धाने आणि राजसी कुलकर्णी या विद्यार्थिनीने गुरुपौर्णिमेचे महत्त्व या विषयावर प्रभावी भाषण सादर केले. आणि तन्मई ब्रम्हेने संस्कृतमध्ये श्लोक सादर केले. व मनस्वी खेडकर हिने कविता सादर केली, विद्यार्थ्यांनी गुरुभक्तीपर गीत, प्रेरणादायी भाषण, संस्कृत श्लोक, कविता तसेच मूल्यशिक्षणावर आधारित नाटिका सादर करून उपस्थितांची मने जिंकली. त्यानंतर आकर्षक नृत्य सादरीकरणाने कार्यक्रमात रंगत आली.

शाळेच्या मुख्याध्यापिका कांचन पापडेजा यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत गुरुंचे जीवनातील अनन्यसाधारण स्थान, शिक्षकांप्रती आदरभाव व संस्कारांचे महत्त्व अधोरेखित केले. शाळेच्या प्राचार्या गीता तांबे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष राम मेंघानी, उपाध्यक्ष रूपचंद मोटवानी, सचिव गोपाल भागवानी, खजिनदार दामोधर माखिजा, विश्वस्त महेश मध्यान, सुरेश हिरानंदानी, राजकुमार गुरुनानी, हरेष मध्यान तसेच प्राचार्या गीता तांबे व मुख्याध्यापिका कांचन पापडेजा यांनी गुरुपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन नम्रता कुकरेजा व प्रीती कटारिया यांनी केले.





मनोहरलाल रामचंद सबलोक प्राथमिक विद्यालयात गुरुपौर्णिमा व मातृ–पितृ पाद्यपूजन सोहळा उत्साहात पार पडला.

# मनोहरलाल रामचंद सबलोक प्राथमिक विद्यालयात गुरुपौर्णिमा व मातृ–पितृ पाद्यपूजन सोहळा उत्साहात

नगर – सेवा शिक्षण प्रसारक मंडळाच्या मनोहरलाल रामचंद्र सबलोक प्राथमिक विद्यालय, अहिल्यानगर येथे भारतीय संस्कृतीची परंपरा जपणाऱ्या 'गुरुपौर्णिमा व मातृ–पितृ पाद्यपूजन सोहळा' अत्यंत उत्साही आणि भारावलेल्या वातावरणात पार पडला. या विशेष कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा व पालकांचा उत्तम प्रतिसाद मिळाला.

या कार्यक्रमास आंतरराष्ट्रीय ख्यातीचे सुप्रसिद्ध गायक माननीय श्री. पवन नाईक सर प्रमुख पाहुणे म्हणून लाभले होते, तर शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. नराल मॅडम यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षपद भूषवले.

कार्यक्रमाची सुरुवात मातृ–पितृ पाद्यपूजन सोहळ्याने झाली. यावेळी विद्यार्थ्यांनी अत्यंत आदराने आणि भक्तीभावाने आपल्या आई–वडिलांचे चरण धुऊन (पाद्यपूजन) त्यांचे पूजन केले. या भावनिक क्षणी आई–वडील हेच आपले पहिले गुरु असतात, ही भावना विद्यार्थ्यांनी कृतज्ञतेने व्यक्त केली.

प्रमुख पाहुणे माननीय श्री. पवन नाईक सर यांनी आपल्या मनोगतातून आई–वडील आणि गुरूंचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून दिले. माणूस चुका करतच शिकतो आणि चुका सुधारतच तो आयुष्यात पुढे जात असतो, असा मोलाचा विचार त्यांनी विद्यार्थ्यांना दिला. तसेच गुरुपौर्णिमा म्हणजेच व्यासपौर्णिमा आणि आपल्या प्राचीन गुरु–शिष्य परंपरेची समृद्ध संस्कृती काय आहे, याची ओळख या कार्यक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना करून देण्यात आली. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले व मोलाचे सहकार्य केले. राष्ट्र आणि संस्कृतीबद्दल आदर निर्माण करणाऱ्या या सुंदर कार्यक्रमाची सांगता उत्साही वातावरणात झाली.

# हिंदी–मराठी गीतांच्या चिंब भिजलेले मैफलीचे १ ऑगस्ट रोजी आयोजन

नगर – श्रीपूजा इव्हेंट्स प्रस्तुत चिंब भिजलेले हा बहुप्रतीक्षित संगीतमय कार्यक्रम १ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजता सावेडी येथील माऊली सभागृह येथे रंगणार आहे. पावसाळ्याच्या रम्य वातावरणात हिंदी व मराठीतील सदाबहार गीतांचा नजराणा रसिकांसमोर सादर केला जाणार असून, टॉप टेन म्युझिशियनसह लाईव्ह ऑर्केस्ट्रा हे या कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरणार आहे.

कार्यक्रमाची संकल्पना व दिग्दर्शन श्रीकांत गडकरी यांचे असून, पूजा गडकरी या आयोजक म्हणून कार्यरत आहेत. या संगीतमय मैफलीत हेमंत नरसाळे, प्रदीप कुलकर्णी, ईस्टर पवार, रविंद्र बक्षी, अभिजित गायकवाड, डॉ. राहुल पंडित, किशोर जाधव, चंदर ललवाणी, अजय दगडे, डॉ. साईप्रसाद शिंदे, उमेश कोठाडिया, समीर खान, राजू क्षेत्रे आणि पवन फिरोदिया हे गायक–कलाकार आपल्या सुरेल सादरीकरणाने रसिकांना मंत्रमुग्ध करणार आहेत.

कार्यक्रमाला साथसंगत देणाऱ्या अनुभवी वादकांमध्ये एडविन परांजपे (कीबोर्ड), संकेत देहाडे (लीड गिटार), प्रकाश लगड (बेस गिटार), नरेंद्र साळवे (कीबोर्ड), श्रीकांत गडकरी (ऑक्टोपॅड/रिदम मशीन), अमोल कनगरे (सॅक्सोफोन), अमित साळवे (ढोलक/तुंबा), बबन साळवे (कॉँगो), यश वाडेकर (फ्लूट), सिद्धार्थ थते (तबला/कॉँगो) आणि विकी साळवे (आर्टीस्ट) यांचा समावेश आहे. त्यांच्या दर्जेदार साथसंगतीमुळे कार्यक्रमाची रंगत अधिक खुलणार आहे.

या कार्यक्रमासाठी काशीद हॉस्पिटल, मिडास सुझुकी, हॉटेल यश पॅलेस, हॉटेल यश ग्रँड, अनंता व्हेज रेस्टॉरंट, वर्ध ग्रीन्स रिसॉर्ट, आमी आणि वासन टोयोटा यांनी प्रायोजक म्हणून सहकार्य केले आहे. तसेच ध्वनी व प्रकाशयोजनेची जबाबदारी हरमन प्रो ऑडिओ अँड लाईट्स ब्रीजेश बजाज यांनी स्वीकारली आहे. पावसाच्या सरींसह सुरेल गीतांचा आनंद घेण्यासाठी आणि अविस्मरणीय संगीत मैफलीचा अनुभव घेण्यासाठी संगीतप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन श्रीकांत गडकरी यांनी केले आहे.



बालक मंदिर महिला मंडळात गुरुपौर्णिमा उत्साहाने साजरी करण्यात आली.

# बालक मंदिर महिला मंडळात गुरुपौर्णिमा उत्साहाने साजरी

नगर – भारतीय संस्कृतीतील गुरु शिष्य या उत्कृष्ट परंपरेचे महत्त्व आजच्या विद्यार्थ्यांमध्ये रुजण्यासाठी बालक मंदिर महिला मंडळ शाळेत आषाढ शुद्ध पौर्णिमा म्हणजेच व्यासपौर्णिमा/गुरुपौर्णिमा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थिनींच्या गुरुवंदनेने कार्यक्रमाचा श्री गणेशा झाला. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान महिला मंडळाच्या अध्यक्षा सौ ज्योती केसकर यांनी भूषवले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुण्या म्हणून नगरमधील उत्कृष्ट नृत्यदिग्दर्शिका आणि धरोहर संस्थेच्या गिर्यारोहक सौ.करिष्मा जोशी यांना आमंत्रित केले होते. विद्यार्थ्यांच्या तोंडपाठ असलेल्या स्तोत्रपठण उपक्रमाचे कौतुक केले आणि उत्कृष्ट बोधप्रद संस्कारक्षम गोष्ट सांगून विद्यार्थी मनाचा ठाव घेतला.

याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ अस्मिता शूळ यांनी आजच्या काळात सुसंस्कारांचे व मूल्यांचे महत्त्व किती आहे हे सांगून गुरुपौर्णिमेच्या उपक्रमाची माहिती दिली. बालवाडी व पहिलीतील विद्यार्थी स्वराज टकले व याने मनाचे श्लोक पाठ म्हटले. इयत्ता दुसरीतील युवराज मारवाडे याने हनुमान चालीसा तोंडपाठ म्हटले तर नचिकेत प्रजापती याने मारुती स्तोत्राचे पठण केले. इयत्ता तिसरी व चौथीतील सुमेध गांधी, ऋत्विक शिंदे, राघव गायकवाड, आरुष सोनवणे या विद्यार्थ्यांनी गणपती अथर्वशीर्ष पठण केले. इयत्ता पाचवीतील हर्षदा मार्डीकर व अनन्या वाघमारे या विद्यार्थिनींनी श्रीरामरक्षा स्तोत्र पठण केले. इयत्ता सहावीतील भाग्यश्री सोनवणे व कीर्ती वड्डेपल्ली या विद्यार्थिनींनी गीतेतील बारावा अध्याय तोंडपाठ म्हटला. इयत्ता सातवीतील जोया सय्यद हिने गीतेचा पंधरावा अध्यायाचे पठण केले.

विद्यार्थ्यांना शाळेतर्फे बक्षीसे देऊन उत्तेजन देण्यात आले. सूत्रसंचालन सौ सीमा कवाष्टे यांनी केले. परिचय सौ. वैशाली सातपुते यांनी केला. पाहुणे व पालकांचे आभार निरुपमा देशपांडे यांनी मानले. फलक लेखन व उत्कृष्ट तयारी अश्विनी मेंद्रे, सुकन्या बोल्ली, ठकू पवार, हेमांगी भिडे, प्राजक्ता मोरे या शिक्षिकांनी केली.

# आठरे पाटील पब्लिक स्कूलमध्ये आषाढी एकादशीनिमित्त चिमुकल्या वारकऱ्यांची दिंडी

नगर – अ.नगर शहराच्या सावेडी विभागातील आठरे पाटील पब्लिक स्कूल या इंग्रजी माध्यमाच्या वसतिगृहात्मक शाळेच्या विद्यार्थ्यांना पारंपारिक धार्मिक सण, उत्सव अवगत व्हावे व त्यांच्या सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासासाठी अनेक उपक्रमांचे आयोजन केले जाते. आषाढी एकादशीनिमित्त पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक विभागाच्या चिमुकल्या बालगोपाळांनी वारकऱ्यांची वेशभूषा करून, पालखी मिरवणुकीद्वारे विठ्ठल नामाच्या जयघोषात व उत्साही वातावरणात दिंडी सोहळा साजरा केला. आषाढ धारांचे आगमन आणि पंढरीच्या वारीची आस वारकरी, विणेकरी, टाळ, मृदुंगाचा गजर करीत पायी वारी संपूर्ण राज्यातील विठ्ठल भक्तीने न्हाऊन निघाली होती.



आषाढी एकादशीच्या निमित्त आठरे पाटील पब्लिक स्कूलच्या बाल वारकऱ्यांनी विठ्ठल नामाची शाळा भरवली होती.

अशातच आषाढी एकादशीच्या निमित्ताने आठरे पाटील पब्लिक स्कूलच्या बाल वारकऱ्यांनी विठ्ठल नामाची शाळा भरवली होती. वारीचा आनंद घेण्यासाठी शाळेतील विद्यार्थ्यांनी दिंडी काढून हा सोहळा मोठया उत्साहात साजरा केला. शाळेतील सर्व विद्यार्थी हातात भगव्या पताका व टाळ घेऊन विठ्ठल नामाचा जयघोष करत होते.

वाद्यवृंदाचा निनाद, अभंगाचे गायन करत व विठू माऊलींच्या नामस्मरणात हा दिंडी सोहळा शाळेच्या प्रवेशद्वारातून प्रस्थान करत, मुख्य इमारतीला प्रदक्षिणा घालत शाळेच्या प्रांगणात अवतरला, जणू अवघे पंढरपूरच अवतरल्याची अनुभूती येत होती.

विठ्ठल – रखुमाई, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम व अन्य संतांच्या वेशभूषा केलेले विद्यार्थी या दिंडी सोहळ्याचे आकर्षण ठरले. चिमुकल्यांनी वारकऱ्यांचा पोशाख परिधान करून कपाळी बुक्का, गळ्यात टाळ आणि नऊवारीत असलेल्या मुलींनी डोक्यावर तुळस घेऊन विठ्ठल नामाचा गजर करत सुंदर असे रिंगण करून दिंडी सोहळ्याचे आकर्षण वाढवले. शाळेतील विद्यार्थी – शिक्षक यांनी विठ्ठल नामांच्या गजरात छान असे नृत्य करुन, सुंदर असे विठ्ठल रखुमाईचे गीत सादर केले. तसेच विद्यार्थी – शिक्षकांनी फुगडी खेळण्याचा आनंद लुटला.

दिडींत सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांचे संस्थेच्या सन्माननीय अध्यक्षा डॉ. अंजली अनिल आठरे पाटील, कार्यकारी विश्वस्त डॉ. अनिल आठरे पाटील, सर्व विश्वस्त यांनी अभिनंदन केले. मुख्याध्यापक, मुख्याध्यापिका, समन्वयक आणि पर्यवेक्षिका यांनी दिंडी सोहळ्यातील विद्यार्थ्यांचे स्वागत करुन मार्गदर्शन केले.

हा चिमुकल्यांचा दिंडी सोहळा यशस्वीतेसाठी पूर्व प्राथमिक, प्राथमिक व माध्यमिक वर्गाचे सर्व वर्गशिक्षक व शिक्षकवृंद–शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. सप्रे जया यांनी केले.

# वाढते तापमान कमी करण्यासाठी झाडे लावा झाडे जगवाही संस्कृती रुजवण्याची गरज

**उपमहापौर धनंजय जाधव यांचे प्रतिपादन; ग्रीन सिटी प्रोजेक्ट अंतर्गत अकराशे विद्यार्थ्यांना रोपांचे वाटप**



हिंद सेवा मंडळाच्या विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या ग्रीन सिटी प्रकल्प अंतर्गत उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते रोपांचे वाटप करण्यात आले.

नगर – दिवसेंदिवस वातावरणातील तापमानाचे प्रमाण वाढत चालले आहे. आमच्या काळात ३६ डिग्री तापमान होते. आज ४२ डिग्री तापमान होते. पुढील दहा वर्षांनी ५० डिग्री तापमान होऊ शकते. त्यावेळेस बाहेर फिरणे देखील अशक्य होईल. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मोठ्या प्रमाणात झाडे लावून ती संवर्धन करण्याची आवश्यकता आहे. शाळेतील मुलांनी दिलेली झाडे त्यांच्या माता–पित्यांच्या नावाने त्यांच्या घराजवळील परिसरामध्ये अंगणात लावून वर्षभर ती झाडे संवर्धन व संगोपन करावे. पुढील वर्षी पुन्हा एकदा कार्यक्रम घेऊन ज्या दहा विद्यार्थ्यांनी झाडांची निगा राखून चांगल्या पद्धतीने संगोपन केले आहे. त्यांना ग्रीन सिटी प्रोजेक्ट तर्फे पुरस्कार देऊन गौरवण्यात येईल. शहरातील वाढते तापमान कमी करण्यासाठी झाडे लावा झाडे जगवा ही संस्कृती रुजविण्याची गरज आहे, असे प्रतिपादन उपमहापौर धनंजय जाधव यांनी केले आहे.

हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी विद्यालय, दादा चौधरी मराठी शाळा, मेहेर इंग्लिश स्कूल, भाईसथ्था नाईट हायस्कूल या शाळेतील विद्यार्थ्यांना पालकमंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांच्या ग्रीन सिटी प्रकल्प अंतर्गत ११०० विद्यार्थ्यांना उपमहापौर धनंजय जाधव यांच्या हस्ते रोपांचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी नगरसेवक दत्ता गाडळकर, भाजपा ओबीसीचे गणेश विद्वे, हिंद सेवा मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, भाईसथ्था नाईट हायस्कूलचे चेअरमन डॉ. पारस कोठारी, कार्यकारणी सदस्या प्रा.ज्योतीताई कुलकर्णी, मेहेर इंग्लिश स्कूलचे चेअरमन जगदीश झालानी, दादा चौधरी विद्यालयाचे चेअरमन अनंत देसाई, दादा चौधरी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका जयश्री ठोकळ, मराठी शाळेचे मुख्याध्यापक सुभाष येवले, मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्य प्राध्यापिका अनुरीता झगडे, अजय महाजन, प्रसाद सामलेटी, मनोज हिरणवाळे, औटी सर आदी उपस्थित होते.

सुमतीलाल कोठारी म्हणाले, ग्रीनसिटी प्रोजेक्ट मूळे शहरात पर्यावरणाची मोठी चळवळ उभी राहिली आहे. दरवर्षी मोठ्या प्रमाणात झाडे लावल्याने पर्यावरणाचे रक्षण होऊन मोठ्या प्रमाणात पाऊस पडेल. यासाठी शाळा, महाविद्यालयातून प्रबोधन होणे गरजेचे आहे. शाळेतील विद्यार्थ्यांनी दिलेले रोपांचे वृक्षारोपण करून संवर्धन करावे.

डॉ.पारस कोठारी म्हणाले, पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या नावाने अहिल्यानगर शहरामध्ये ग्रीन सिटी प्रोजेक्ट हरितनगर करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. ग्रीनसीटी प्रोजेक्टसाठी धनंजय जाधव यांनी पुढाकार घेतला असून या उपक्रमाच्या माध्यमातून सावली देणारी फळझाडे, औषधी वनस्पती आणि स्थानिक हवामानास अनुकूल झाडे लावली जात आहेत. पर्यावरणाचे संवर्धन, हरित परिसराची निर्मिती, प्रदूषण कमी करणे आणि पुढील पिढीसाठी निरोगी व समृद्ध पर्यावरण निर्माण करणे हा मुख्य उद्देश या पर्यावरण पूरक कार्यक्रमाचा आहे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने दरवर्षी किमान एक तरी वृक्ष लावून त्याचे संगोपन करण्याचा संकल्प करावा. ज्योतीताई कुलकर्णी म्हणाले, अडुळसा, शतावरी, तुळस, अश्वगंधा या आयुर्वेदिक रोपांचे प्रत्येकाने संवर्धन करावे. आयुर्वेदिक वनस्पती आरोग्यासाठी फलदायी असतात. पाहुण्यांच्या परिचय उषा भालेराव यांनी करून दिला. सूत्रसंचालन सौ. वर्षा गुंडू यांनी केले. सौ.ताटी यांनी आभार मानले.



महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद परिचर कर्मचारी संघटनेची त्रैमासिक बैठक अहिल्यानगर येथील लक्ष्मी नारायण मंगल कार्यालयात नुकतीच पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी भाऊसाहेब पठाण होते.

## जिल्हा परिषदेतील रिक्त चतुर्थ श्रेणी पदे सरळसेवेने भरा

नगर – महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद परिचर कर्मचारी संघटनेची त्रैमासिक बैठक अहिल्यानगर येथील लक्ष्मी नारायण मंगल कार्यालयात नुकतीच पार पडली. सभेच्या अध्यक्षस्थानी भाऊसाहेब पठाण होते. प्रमुख पाहुणे म्हणून बाबाराव कदम, राज्य संघटनेचे अध्यक्ष मुकुंदराव तुरे, संदीप चौधरी, जिल्हाध्यक्ष निलेश गाडेकर, कार्याध्यक्ष अशोक काळापहाड, राज्य उपाध्यक्ष सागर आगरकर,कार्याध्यक्ष ऋषिकेश बनकर, अनिल येनगुल, अंजली अमृत, संदीप विधाते, अनघा कुलकर्णी, अनिता साठे, विजय वाबळे, शाम शेळके, हैबत भांगरे, इंद्रभान गावडे, सुरेश माळवदे, किरण खेडकर, प्रकाश धोत्रे, राहुल साळवे, भरत शेंडगे, संजय दिवाण, शितल साठे, निर्मला गोरे, अश्विनी आगरकर, दादा बरबडे, ओंकार पानमळकर, संजय गायकवाड, पंकज बारवकर, योगेश नजन, ताराबाई साळुंके, सुरेश भोजणे आदी उपस्थित होते.

सभेच्या सुरुवातीला मागील सभेचे इतिवृत्त वाचन करून मंजुरी देण्यात आली. प्रास्ताविकात कार्याध्यक्ष अशोक काळापहाड यांनी संघटनेच्या कामकाजाचा आढावा व कर्मचाऱ्यांच्या अडचणींचा आढावा घेतला.

अध्यक्षीय भाषणात भाऊसाहेब पठाण यांनी शासन स्तरावरील मागण्या मांडल्या. जिल्हा परिषदेतील सर्व विभागातील रिक्त असलेली चतुर्थ श्रेणीची पदे तातडीने सरळ सेवेने भरावी. ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या धर्तीवर जिल्हा परिषदेतील महिला परिचरांना अंगणवाडी सेविका, ग्रामपंचायत अधिकारी, स्थापत्य अभियांत्रिकी सहाय्यक, पशुधन पर्यवेक्षक या पदांसाठी २५% पदे पदोन्नतीसाठी राखीव ठेवावी.

परिचर पदावरून व्रणोपचारक पदावर पदोन्नती राबविण्यात यावी. तसेच या कर्मचाऱ्यांना आरोग्य सेवक पदावर पदोन्नतीची संधी उपलब्ध करून द्यावी. काही जिल्ह्यांमध्ये आरोग्य सेवक पदोन्नती प्रक्रियेत अडचणी येत आहेत. त्याबत जिल्हा संघटनेने राज्यस्तरावर आवश्यक माहिती उपलब्ध करावी, असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अदिनाथ मोरे यांनी केले. सागर आगरकर यांनी आभार मानले.

## पद्मशाली सोशल फाउंडेशनट्रस्टच्या वतीने विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप



पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने श्री मार्कंडेय शैक्षणिक संकुल येथे शहरातील विविध शाळांमधील १५० विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले.

नगर – पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टच्या वतीने श्री मार्कंडेय शैक्षणिक संकुल येथे शहरातील विविध शाळांमधील १५० विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून इंजि. प्रशांत कोक्कुल, इंजि. अक्षय बल्लाळ, अमित सुंकी, गणेश अवधूत, बाबासाहेब तिपुले, राजू कोडम उपस्थित होते. तसेच पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्टचे अध्यक्ष गणेश लकशेट्टी, सचिव अजयकुमार लयचेट्टी, उपाध्यक्ष श्रीनिवास बुरगुल, राजेंद्र बुलबुले, वरद लकशेट्टी, ओंकार आडेप, ओंकार जेटला यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले.

प्रमुख पाहुणे इंजि. प्रशांत कोक्कुल यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांच्या हातात शालेय दप्तर देणे म्हणजे केवळ शैक्षणिक साहित्याचे वाटप नव्हे, तर त्यांच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी करण्याचे काम आहे. आर्थिक अडचणीमुळे कोणत्याही विद्यार्थ्याचे शिक्षण थांबू नये, यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने आपल्या परीने योगदान देणे आवश्यक आहे. पद्मशाली सोशल फाउंडेशनने गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने राबविलेला हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्कृष्ट उदाहरण आहे. शिक्षण हीच समाज परिवर्तनाची सर्वात मोठी ताकद आहे. विद्यार्थ्यांना योग्य वेळी प्रोत्साहन आणि आवश्यक साहित्य उपलब्ध झाले, तर त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण होतो आणि ते मोठी स्वप्ने पाहण्यास सक्षम होतात. समाजातील गरजू घटकांसाठी सातत्याने कार्य करणाऱ्या पद्मशाली सोशल फाउंडेशनचे कार्य निश्चितच प्रेरणादायी असून अशा विधायक उपक्रमांमुळे समाजात सकारात्मक परिवर्तन घडण्यास मोठी मदत होत आहे.

प्रास्ताविकात बोलताना ट्रस्टचे अध्यक्ष गणेश लकशेट्टी म्हणाले, पद्मशाली सोशल फाउंडेशन ट्रस्ट गेल्या दहा वर्षांपासून सातत्याने दप्तर वाटपाचा उपक्रम राबवत आहे. या दहा वर्षांत १,५०० विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले असून यावर्षी शहरातील विविध शाळांमधील १५० गरजू विद्यार्थ्यांना या उपक्रम ाचा लाभ देण्यात आला आहे. आर्थिक परिस्थितीमुळे कोणताही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित राहू नये, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश आहे. फाउंडेशनच्या माध्यमातून वर्षभर विविध सामाजिक उपक्रम राबविण्यात येतात. वारकऱ्यांना अल्पोपहार वाटप, श्रावण महिन्यात महाप्रसाद भंडारा, गरजू रुग्णांना आर्थिक मदत, आर्थिक अडचणीत सापडलेल्या कुटुंबांना सहकार्य तसेच विविध सामाजिक प्रश्न सोडविण्यासाठीही फाउंडेशन सातत्याने प्रयत्नशील असते. भविष्यातही समाजातील गरजू घटकांना विविध उपक्रमांच्या माध्यमातून मदतीचा हात देण्याचे कार्य अधिक व्यापक स्वरूपात सुरू राहील.

यावेळी ट्रस्टचे सचिव अजयकुमार लयचेट्टी यांनी सांगितले की, पद्मशाली सोशल फाउंडेशन गेल्या दहा वर्षांपासून सामाजिक क्षेत्रात कार्यरत असून यावर्षी शहरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप करण्यात आले. यामध्ये श्रमिकनगर येथील श्री मार्कंडेय प्राथमिक विद्यालय, दादा चौधरी मराठी शाळा, महात्मा फुले विद्यामंदिर, दादा चौधरी विद्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा (उक्कडगाव), प्रगत माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, कै. वि. ल. कुलकर्णी प्राथमिक शाळा, बालक मंदिर महिला मंडळ, सिताराम सारडा माध्यमिक विद्यालय, मनोहरलाल रामचंद्र सबलोक प्राथमिक विद्यालय, शारदा विद्यामंदिर, १०८ श्री महंत पंडित सुच्चासिंगजी महाराज माध्यमिक विद्यालय, श्रीमती पार्वतीबाई डहाणूरकर कन्या विद्यालय आणि महर्षी ग. ज. चितांबर विद्यामंदिर या शाळांमधील प्रत्येकी दहा विद्यार्थ्यांना शालेय दप्तरांचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीनिवास बुरगुल यांनी केले, तर अमित सुंकी यांनी आभार प्रदर्शन केले.



सारडा महाविद्यालयात 'विठ्ठल तुळशीची बागेत संत महिपती महाराजांच्या दिंडीचे मठाधिपती अर्जुन तनपुरे महाराज यांच्या हस्ते तुळशीची रोपे लावण्यात आली.

## विठ्ठलाच्या चरणांच्या प्रतीकात्मक आकारात साकारली 'विठ्ठल तुळशीची बाग'

**सारडा महाविद्यालयाचा भक्ती आणि पर्यावरणपूरक उपक्रम**

नगर – सारडा महाविद्यालयाती उद्यानात विठ्ठलाच्या चरणांच्या प्रतीकात्मक आकारात 'विठ्ठल तुळशीची बाग' साकारून त्यामध्ये वारकऱ्यांच्या हस्ते तुळशीची अनेक रोपे लावण्याचा अनोखा भक्ती आणि पर्यावरण संवर्धनाचा संगम घडविणारा उपक्रम राबवला. विठ्ठलाच्या नामघोषाच्या भक्तिमय वातावरणात तुळशीची रोपे लावण्यात आली. या उपक्रमात संत महिपती महाराजांच्या दिंडीचे मठाधिपती अर्जुन तनपुरे महाराज यांच्यासह दिंडीतील वारकरी, चोपदार यांच्या हस्ते तुळशीची रोपे लावण्यात आली. यावेळी हिंद सेवा मंडळाचे सचिव संजय जोशी, कार्याध्यक्ष सुमतीलाल कोठारी, ज्युनिअर कॉलेजचे चेअरमन मधुसूदन सारडा, ज्येष्ठ मार्गदर्शक अजित बोरा व ब्रिजलाल सारडा, प्रा.ज्योती कुलकर्णी, जगदीश झालानी, रणजीत श्रीगोड, विष्णू सारडा, प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित, विठ्ठल उरमूडे, उपाप्राचार्य मिलिंद देशपांडे व गिरीश पाखरे, अतुल सामल, बजरंग दरक, स्मिता सारडा, लौकिक शिंगवी आदींसह प्राध्यापक, विद्यार्थी सहभागी झाले. महाविद्यालयात दिंडीचे स्वागत करण्यात आले.

संजय जोशी म्हणाले, सरस्वती देवीचे मंदिर असलेले सारडा महाविद्यालयात वारकऱ्यांची दिंडी आल्याने ही भूमी पावन झाली आहे. येथे साकारण्यात आलेल्या 'विठ्ठल तुळशी बागेतील तुळशीच्या झाडांमुळे महाविद्यालयाचा परिसर कायम शुद्ध व पवित्र राहील.

मठाधिपती अर्जुन तनपुरे महाराज म्हणाले, विठ्ठलाच्या पाऊलाच्या आकारात 'विठ्ठल तुळशीची बाग' साकारण्यात आल्याने भगवंताचे पाऊल कायम येथे वास्तव्यास असणार आहे. ही तुळशीची बाग भविष्यात आकार्षांचे केंद्रबिंदू ठरेल, असे सांगून महाविद्यालय संत महिपती देवस्थानच्या वतीने अक्षयरुपी वडाचे दोन झाडे भेट दिली.

प्रास्ताविकात प्राचार्य डॉ.माहेश्वरी गावित म्हणाल्या, तुळस ही भारतीय संस्कृतीतील पवित्र आणि औषधी गुणांनी समृद्ध वनस्पती असून, विठ्ठल भक्तीत तिचे विशेष स्थान आहे. विठ्ठलाच्या चरणांच्या प्रतीकात्मक आकारात तुळशीची बाग साकारून महाविद्यालयाने भक्ती, संस्कृती आणि पर्यावरण संरक्षण यांचा अनोखा संगम घडवून आणला. प्रा. राजेंद्र देशमुख यांनी आभार मानले. प्रा.प्रसाद बेडेकर यांनी सूत्रसंचालन केले.

## सामूहिक विवाह सोहळा आयोजनासाठी नोंदणीकृत सेवाभावी संस्थांनी प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन

नगर – कन्यादान योजनेअंतर्गत जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या वधू–वरांसाठी सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यासाठी नोंदणीकृत सेवाभावी संस्था व यंत्रणांनी प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन राजूर एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी केले आहे.

सन २०२६–२७ या वर्षात जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या जोडप्यांना २५ हजार रुपये, तर सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करणाऱ्या नोंदणीकृत सेवाभावी संस्थांना प्रत्येक जोडप्यामागे २ हजार ५०० रुपये इतके अनुदान देण्यात येणार आहे.

प्रस्तावासोबत संस्थेचा नोंदणी दाखला, संस्थेच्या घटनेची प्रत, संचालक मंडळाची यादी तसेच अध्यक्ष व सचिव यांच्या आधार कार्डाच्या प्रती जोडाव्यात. संस्था आर्थिकदृष्ट्या सक्षम असावी. संस्थेने कोणताही आर्थिक गैरव्यवहार केलेला नसल्याचे अथवा संस्थेविरुद्ध कोणताही गुन्हा दाखल नसल्याचे १०० रुपयांच्या मुद्रांक कागदावरील प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

संस्थेने वर व वधूचे विवाह नोंदणी अर्ज शासन निर्णयानुसार आवश्यक कागदपत्रांसह प्रकल्प अधिकाऱ्यांकडे सादर करणे बंधनकारक राहील. प्रस्ताव अथवा लाभार्थ्यांची कागदपत्रे अपूर्ण असल्यास संस्थेची निवड रद्द करण्यात येईल व अनुदान देण्यात येणार नाही. सहभागी जोडप्यांना विवाहाच्या दिवशी विवाह नोंदणी प्रमाणपत्र देणे बंधनकारक आहे.

संस्थेने सादर करावयाचा प्रस्ताव व त्यातील अटी–शर्ती या ३ मार्च २००४, १८ फेब्रुवारी २००९ व १५ मार्च २०२४ रोजीच्या शासन निर्णयांतील परिशिष्ट 'अ' व 'ब' नुसार असाव्यात. मंजूर लक्षांकानुसार पात्र लाभार्थी उपलब्ध न झाल्यास लक्षांक वर्गवारीत बदल करण्याचे तसेच इतर आनुषंगिक अधिकार प्रकल्प अधिकाऱ्यांकडे राहतील. याशिवाय इतर अटी व शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

संस्थेने विवाह सोहळ्याची छायाचित्रे, चलचित्रफीत व जिओटॅगसह सविस्तर अहवाल सादर करावा. अनुदानाची रक्कम वर–वधूच्या संयुक्त खात्यात तसेच संस्थेच्या आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँकेच्या खात्यात डीबीटी प्रणालीद्वारे जमा करण्यात येईल.

प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, राजूर यांच्या मार्गदर्शनाखाली योजनेची अंमलबजावणी व देखरेख करण्यात येईल. सन २०२६–२७ या वर्षासाठी टीएसपी क्षेत्रासाठी ३० जोडप्यांचा लक्षांक मंजूर करण्यात आला आहे. प्रत्येक सामूहिक विवाह सोहळ्यासाठी किमान १० जोडपी असणे आवश्यक आहे. निवड झालेल्या संस्थांनी कन्यादान योजनेच्या शासन निर्णयानुसार कार्य करणे बंधनकारक राहील.

योजनेतील सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत १०० रुपयांच्या मुद्रांक कागदावर करारनामा सादर करावा लागेल. योजनेच्या लाभासाठी लाभार्थ्याचा अर्ज आवश्यक आहे. वधू–वरांपैकी किमान एक जण अनुसूचित जमातीचा असावा. यासाठी सक्षम अधिकाऱ्याने दिलेला जातीचा दाखला, जन्मतारखेसाठी शाळा सोडल्याचा दाखला, आधार कार्ड, रेशनकार्ड, आधार संलग्न राष्ट्रीयकृत बँकेचे पासबुक, यापूर्वी योजनेचा लाभ घेतला नसल्याबाबत ग्रामसेवकाचा दाखला, अधिवास (डोमिसाईल) दाखला तसेच वर व वधू या दोघांचाही हा प्रथम विवाह असून त्यांना अपत्य नसल्याचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

वराचे वय किमान २१ वर्षे व वधूचे वय किमान १८ वर्षे पूर्ण असावे. बालविवाह प्रतिबंधक कायदा व हुंडा प्रतिबंधक कायद्याचे उल्लंघन न केल्याबाबतचे प्रतिज्ञापत्र वर व वधू यांनी १०० रुपयांच्या मुद्रांक कागदावर विहित नमुन्यात सादर करणे बंधनकारक आहे. लाभार्थ्यांनी आपले अर्ज निवड झालेल्या संस्थेकडे सादर करावेत.

## स्वामी समर्थ मंदिरात भाविकांची मांदियाळी



स्वामी समर्थ मंदिरात महापौर ज्योतीताई गाडे यांनी दर्शन घेतले. वैभव भारती महाराज यांनी या वस्तूंची माहिती दिली. (छाया – विजय मते)

नगर – सावेडी उपनगरातील गुलमोहर रोडवरील प्रती अक्कलकोट असलेल्या श्री स्वामी समर्थ मंदिरात गुरुपौर्णिमेला भाविकांची मांदियाळी झाली. यावेळी महाराजांच्या दिव्य वस्तूंच्या दर्शनाचा हजारो भाविकांनी लाभ घेतला.

गुरुपौर्णिमेनिमित्त मंदिरात श्री गुरु लीलामृत पारायण सोहळा पार पडला. गुरु पौर्णिमेला पहाटे श्रींच्या मूर्तीस रुद्राभिषेक करण्यात आला. यावेळी नगरसेवक विलास नाकाडे, शितल नाकाडे या दांपत्यांनी महापूजा करून अभिषेक केला. दुपारी श्री स्वामी याग संपन्न झाला. यावेळी होम हवन पूजा किरण वाकडमाने, तनुजा वाकडमाने, अजित अकोलकर – सुवर्णा अकोलकर, या दांपत्यांच्या हस्ते करण्यात आली. दर्शनासाठी भाविकांनी सकाळपासूनच गर्दी केली होती. मंदिराच्या सेवेकर्यांनी सर्व भाविकांना प्रसादाचे वाटप केले.

अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ महाराजांच्या अंगावरील व नित्य वापरातील मणी, गळ्यातील माळ व कंठी कानातील – गळ्यातील रुद्राक्ष, नित्य पूजेतील शिवलिंग अशा दिव्य वस्तूं दर्शनासाठी ठेवण्यात आल्याने त्याचा हजारो भाविकांनी लाभ घेतला. अहिल्यानगरच्या महापौर ज्योतीताई गाडे यांनीही दर्शन घेतले. यावेळी वैभव भारती महाराज यांनी या वस्तूंचे महत्त्व सांगितले. स्वामींच्या दर्शनासाठी अहिल्यानगरचे आ. संग्राम जगताप यांच्या मातोश्री पार्वतीबाई जगताप तसेच शितलताई जगताप यांनीही हजेरी लावली होती. दर्शनासाठी भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

## पर्यावरणपुरक देववृक्ष परिसराला निरोगी व आरोग्यदायी वातावरण निर्माण करतील

**वसंत लोढा ५५६ झाडे लावण्याचा संकल्प, पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान व अनुलोम संस्थेचा अनोखा उपक्रम**



पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट व अनुलोम संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण करण्यात आले.

नगर – पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान व अनुलोम संस्थेच्या वतीने शहरात विविध ठिकाणी ५५६ झाडे लावण्यात येणार आहेत. याचाच एक भाग म्हणून धार्मिक परीक्षा बोर्ड आनंदऋषीजी मार्ग या परिसरामध्ये दहा देव वृक्षांची झाडे लावण्यात आले आहेत. तसेच झाडांचे संरक्षण व्हावे. यासाठी ट्री गार्ड ही बसविण्यात आले आहेत. दीनदयाळ परिवाराचे कार्याध्यक्ष सुरज अग्रवाल यांच्या संकल्पनेतून वृक्षारोपण करण्यात आले आहे. तसेच या झाडांचे संगोपन व्हावे संवर्धन व्हावे यासाठी परिसरातील नागरिकांनी झाडे दत्तक घेऊन झाडांची निगा राखून संवर्धन करण्यासाठी जबाबदारी घेतली आहे. येथे लावण्यात आलेली पर्यावरणपुरक देववृक्ष परिसराला निरोगी व आरोग्यदायी वातावरण निर्माण करतील, असे प्रतिपादन भाजपचे तथा पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानचे संस्थापक वसंत लोढा यांनी केले आहे.

पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट व अनुलोम संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने देववृक्ष लागवड व संवर्धन अभियानांतर्गत धार्मिक परीक्षा बोर्ड, आनंदऋषीजी मार्ग येथे केशर गुलाब जवळ कडूलिंबा, करंजी, वड, जांभूळ, आवळा, सोनचाफा, बहावा या देववृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. याप्रसंगी वसंत लोढा, अध्यक्ष धनंजय तागडे, सचिव बाळासाहेब भुजबळ, उपाध्यक्ष अशोक कानडे, सोमानी मनीष, संदेश लोढा, अनुराग धूत, प्रीतम मुथा, राहुल जामगावकर, महावीर कांकरिया, अनुलोम संस्थेचे दीपक रोहोकले, अमोल अवस्थी, निलेश चिपाडे, उदय अनुभुले, मॉर्निंग ग्रुप जेष्ठ नागरिक चंद्रभान अग्रवाल, संजय वखारिया, नंदकुमार मेहेर, हिम्मतलाल शिंगी, जीवन मुनोत, अशोक गांधी, दिलीप गुगळे, पारस कांकरिया, सुभाष मुनोत, दिलीप गुंदेचा, राजू लुनिया, मिलाप पटवा, दीपक गांधी, सचिन डुंगरवाल, दिलीप धोखा, ॲड. शशिकांत गांधी, सुरेश कटारिया, परिसरितील नागरिक ह.भ.प.विश्वनाथ महाराज राउत अण्णा, श्री.फुलसौंदर, सुभाष पोखरणा, जीतू पोरवाल, दिलीप बोरा, जगदीश दरक, रितेश कोठारी, अमोल पोखरणा, श्रीमती शैला गांधी यांचे सहकार्य लाभले.

सुरज अग्रवाल यांनी स्वागत केले. ते पुढे म्हणाले, झाडे लावा झाडे जगवा ही संस्कृती पुढे नेण्यासाठी परिसरातील नागरिकांनी प्रतिसाद दिला आहे. तसेच वृक्ष संवर्धनासाठी येथील नागरिक काळजीपूर्वक झाडांची निगा राखतील. असे सांगितले.

दीपक रोहोकले म्हणाले, अनुलोमचे मुख्य मार्गदर्शक देवेंद्र फडणवीस यांच्या ५६व्या वाढदिवसानिमित्त संपूर्ण महाराष्ट्र मध्ये ५६००० वृक्ष लावण्याचा व संवर्धन करण्याचा संकल्प केला आहे. पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठान ट्रस्ट व अनुलोम संस्थेच्या वतीने शहरात पर्यावरणाची चळवळ उभी राहण्यासाठी वृक्षारोपणाचे कार्यक्रम हाती घेण्यात आले आहेत. शहरात विविध ठिकाणी वृक्षारोपण करण्यात येणार आहे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविकात धनंजय तागडे यांनी पंडित दीनदयाळ परिवार प्रतिष्ठानच्या उपक्रमांची माहिती दिली. बाळासाहेब भुजबळ यांनी आभार मानले.

# धम्माल मनोरंजन

## सुविचार



अविरत उदयोग हा शांती-समाधानाचा अखंड झरा आहे.

## दिनविशेष ३१ जुलै

१४९८ : ख्रिस्तोफर कोलंबस हा पश्चिम गोलार्धातील तिसऱ्या प्रवासादरम्यान त्रिनिदाद बेटांचा शोध घेणारा पहिला युटोपियन बनला.
१६५७ : मुघलांनी विजापूरचा कल्याणी किल्ला जिंकला.
१६५८ : औरंगजेब मुघल सम्राट झाला.
१८५६ : न्यूझीलंडची राजधानी क्राइस्ट चर्चची स्थापना.
१९३७ : के. नारायण काळे यांनी दिग्दर्शित केलेला वहाँ हा प्रभातचा चित्रपट मुंबईतील मिनर्व्हा टॉकीजमधे प्रदर्शित झाला.
१९४८ : न्यूयॉर्क आंतरराष्ट्रीय विमानतळ उघडले.१९५१ : जपान एरलाइन्सची स्थापना झाली.
१९५४ : के-२ (माउंट गॉडविन ऑस्टिन) हे जगातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वोच्च शिखर इटालियन गिर्यारोहकांनी प्रथमच सर केले.
१९५६ : जिम लेकर कसोटी सामन्यात एका डावात सर्व १० विकेट घेणारा पहिला गोलंदाज ठरला.
१९६४ : रेंजर ७ अंतराळयानाने चंद्राची पहिली स्पष्ट छायाचित्रे घेतली.
१९९२ : जॉर्जियाचा संयुक्त राष्ट्रांमध्ये प्रवेश.
१९९२ : सातारचे वादक पं. रविशंकर यांना रॅमन मॅगसेसे पुरस्कार प्रदान करण्यात आला.
२००० : वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे महासंचालक डॉ. रघुनाथ माशेलकर आणि प्रगत तंत्रज्ञान केंद्र डॉ. डी. डी. भवाळकर यांना एच. के फिरोदिया पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.
२००१ : डॉ. जब्बार पटेल यांना राजर्षी शाहू महाराज समता पुरस्कार संचालक प्रदान.
२०१२ : मायकेल फेल्प्सने ऑलिम्पिकमध्ये सर्वाधिक पदक जिंकण्याचा विक्रम मोडला.

## धारणात् धर्म

एकदा एका शरीरातील वेगवेगळ्या अवयवांचे परस्परात मोठे भांडण झाले. हात-पाय-नाक-डोळे-तोंड-दात-जीभ यातील प्रत्येक जण स्वतःचे महत्व सांगताना, माझ्याशिवाय शरीर चालणे अशक्य आहे असे सांगू लागले. मीच सर्वश्रेष्ठ आहे असे अहंकाराने बोलून प्रत्येकाने आपले कार्य सोडून दिले. हातांनी आपले कार्य थांबवले तेव्हा शरीराला त्रास झाला. पण शरीराचे कार्य चालूच होते. त्यावेळी हातांच्या लक्षात आले मी कार्य थांबविले असले तरी माझ्याशिवाय शरीर क्रिया चालूच आहे. इतर सर्व अवयवांना तसाच अनुभव आला. मग सर्व अवयव पुन्हा आपापले कार्य करु लागले. परंतु या अवयवांचे भांडणामुळे त्रासलेला प्राण शरीराचा त्याग करण्यास प्रवृत्त झाला. त्यामुळे सगळे अवयव निर्जीव होऊ लागले. त्यांच्यातील कार्यशक्ती नष्ट झाली. हे लक्षात येताच त्यांनी प्राणदेवाला प्रार्थना केली,हे प्राणदेवा, तूझ्याशिवाय आमचे अस्तित्व अशक्य आहे. कृपा करून तू जाऊ नकोस. तात्पर्य, आपापसातील भांडणामुळे कार्याची हानी होते. शरीरातील अवयव काय किंवा समाजातील घटक काय. ते एकरूप,परस्पर पूरक असतील तरच सर्वांची धारणा होते. त्यास धर्म म्हणतात.

## महाशब्दकोडे

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ■ | ४ | ५ | | ■ | ६ | ७ | ■ | ८ |
| ९ | | ■ | १० | | | | ■ | ११ | ■ | | ■ | |
| | ■ | १२ | | ■ | ■ | १३ | १४ | | | | ■ | |
| १५ | १६ | | | १७ | | | | | ■ | ■ | ■ | |
| १८ | | | ■ | | ■ | ■ | | ■ | ■ | १९ | २० | |
| ■ | | ■ | ■ | | ■ | २१ | ■ | २२ | २३ | | | |
| २४ | | २५ | | | | | ■ | २६ | | ■ | | ■ |
| | ■ | | ■ | | ■ | ■ | २७ | | | ■ | ■ | २८ |
| २९ | ३० | | ■ | ३१ | ३२ | ३३ | | ■ | ३४ | ३५ | ३६ | |
| ३७ | | ■ | ३८ | | | | ■ | ३९ | ■ | ४० | | |
| ४१ | | | ■ | ■ | | ■ | ४२ | | ४३ | ■ | ■ | |
| ४४ | | ■ | ४५ | ४६ | | ४७ | | ■ | ४८ | | ४९ | |
| ■ | ■ | ५० | | | ■ | ५१ | | | | ■ | ५२ | |

### आडवे संकेत

१) कोणीकडे जावयाचे याविषयी भ्रमात पडणे
४) अघोर पंथातील
६) धान्याचा ढीग
९) कपडे
१०) रुचकर
१२) क अ चा अक्षरबदल
१३) अंजनीसुत
१५) एकच प्याला चे नाटककार
१८) तिसराच कोणीतरी
१९) एक आश्चर्यकारक उद्गार
२२) एक प्रसिद्ध किल्ला
२४) कार्यक्रमाचा शेवट
२६) पर्याय, गवत
२७) शिकार करणारा
२९) युद्ध
३१) प्रसिद्धी
३४) आठवड्यातील एक दिवस
३७) मनुष्य जातीचा
३८) आरडाओरड, गडबड
४०) सुत विणण्याचे एक साधन
४१) मोडणे, छिन्न होणे
४२) मोठे घर
४४) लोखंडी आकडा
४५) मेखला
४८) xxxx ही धर्मस्य
५०) गाईचे पोर
५१) भित्रा
५२) बाण

### उभे संकेत

१) अहोरात्र
२) धर्मानियम
३) फेंगडणे
४) देणे (हिं.)
५) पालीच्या जातीतील एक प्राणी
७) जिकडे तिकडे
८) खडबडीत
११) वानराची मादा
१२) हिंदीत ऑगस्ट
१४) विटीदांडूच्या खेळातील एक संज्ञा
१६) मयासुर राक्षसाने पांडवास बांधलेली अद्भूत वास्तू
१७) एक प्रसिद्ध गायीका
१९) वर (इं.)
२०) पांढरा ढोंगी साधू
२१) xx पान, आदर सत्कार
२२) गवगवा
२३) चंद्र
२४) हो म्हणून ऐन वेळी पुर्तता न करणे
२५) पेन्सिलचे लिहिलेले खोडणारा
२७) अलगुज
२८) कारखान्याचा मालक
३०) शारिरीक थकवा
३२) नवरदेव नवरी
३३) गोंद ३५) हलकट
३६) दिवस
३९) इडा, पिडा
४२) जहाचे थांबण्याचे ठिकाण
४३) समर्थ
४५) सत्त्वांश
४६) करु किंवा xx
४७) प्रस्तावित योजनेविरुद्ध उभे ठाकणे
४९) रघुला त्याच्या कामात xx मिळाले

### मागील उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| प्रा | ध्या | प | क | ■ | रा | ज | गि | रा | ■ | वै | ■ | ब्र |
| व | स | न | ■ | बा | जी | ग | र | ■ | स | र | ता | ज |
| र | ■ | वे | ग | ळा | ■ | त | गा | ई | ■ | ■ | क | ला |
| ण | ■ | ल | ■ | सा | न | ■ | व | न | मा | ळी | ■ | ल |
| ■ | सं | ■ | म | हे | श्व | र | ■ | मी | ल | ■ | ■ | बि |
| स | प | ना | ■ | ब | र | डा | ■ | न | वा | ■ | ■ | या |
| र | ■ | क | म | ठा | ■ | र | ■ | स | ह | ध | र्मि | णी |
| स | ■ | ■ | न | क | ल | ■ | दि | वा | क | र | ■ | ■ |
| नि | च | रा | ■ | रे | ट | ■ | ■ | ती | ■ | प | लं | ग |
| र | क | ■ | अ | ■ | क | ट | क | न | ■ | क | ■ | रु |
| स | वि | ता | प्र | भु | णे | ■ | ल | ■ | घो | ड | दौ | ड |
| ■ | णे | ■ | त्य | ■ | ■ | वि | दा | र | क | ■ | ल | ■ |
| ■ | ■ | अ | क्ष | य | कु | मा | र | ■ | णे | ■ | त | ळे |




## शास्त्रीय उपकरणे व उपयोग

मायक्रोस्कोप - सूक्ष्म वस्तू बघण्यास
कॉम्प्युटर - मोठ्या प्रमाणात गणिती प्रक्रिया करणारे
थर्मोस्टॅट - ठराविक तापमानापर्यंत नियंत्रण ठेवण्यास
सिस्मोग्राफ - भूकंपाच्या धक्क्यांचे मापन
ॲमीटर - विद्युत प्रवाह ॲम्पीयअरमध्ये मोजण्यास
हायड्रोजन मीटर- पाण्यातील आवाज मोजण्यास
बॅरोमीटर - हवेचा दाब मोजण्यासाठी
कार्डियोग्राम - हृदयाची स्पंदने मोजण्यासाठी
थिओडोलाईट - उभ्या व आडव्या पातळीवरील कोन मापन करण्यास
अल्टीमीटर - समुद्र सपाटीपासूनची उंची मोजण्यास विमानात वापरतात
लॅक्टोमीटर - दुधाची शुद्धता मोजण्याची उपकरण
हायग्रोमीटर - हवेतील दमटपणा मोजण्यास
गायरोस्कोप - वर्तुळाकार भ्रमण करणाऱ्या वस्तूंची गती मोजण्यास
ॲनेमोमीटर - वाऱ्याचा वेग व दिशा मापक उपकरण
बॅरोग्राफ - हवेचा दाब अखंडपणे मोजण्यास
कार्बुरेटर - हवा व पेट्रोल अंतर्गत ज्वलन इंजिनात
ॲलिमोमीटर - ध्वनीची तीव्रता डेसीबलमध्ये मोजण्यासाठी
टेलिप्रिंटर - एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी मजकुर छापण्यास
क्रोनोमीटर - जहाजात काल मापनासाठी वापरण्यात येणारे घड्याळ
पायरोमीटर - उच्च तापमान मोजण्यास
मायनोमीटर - हवेचा दाब मोजण्यास
टेलस्टार - हा उपग्रह आहे त्यामुळे टेलिफोन, टेलिव्हीजन यांचे दळणवळण एका खंडातून दुसऱ्या खंडात शक्य झाले.
रडार - रेडीओ, सुक्ष्म लहरीच्या सहाय्याने आकाशातील वस्तुंचे स्थान, दिशा व वेग दाखविण्यास

## प्रसिद्ध शहरांची भौगोलिक नावे

बंगालचे अश्रू - दामोदर नदी
चीनचे अश्रू - हँ-डॉन्ग- हो
काळे खंड - आफ्रिका
गुलाबी शहर - जयपूर
अंधकारमय खंड - आफ्रिका
भारताचे प्रवेशद्वार - मुंबई
उत्तुंग इमारतीचे शहर - न्यूयॉर्क
पवित्रभूमी - पॅलेस्टाईन
नाईलची देणगी - इजिप्त
भूमध्य समुद्राची किल्ली - जिब्राल्टर
सात बेटांचे शहर - मुंबई
उंच इमारतीचे शहर - न्यूयॉर्क
एक हजार सरोवरांचा देश- फिनलॅंड
पांढऱ्या हत्तीचा देश - सयाम (थायलंड)
उगवत्या सूर्याचा देश - जपान
मनोऱ्यांचे शहर - ऑक्सफर्ड इंग्लंड
पंच नद्यांचा देश - पंजाब
सात पर्वतांचे शहर - रोम (इटली)
सुर्यास्ताचा देश - अमेरिका
निळे पर्वत - निलगिरी पर्वत
उत्तरेकडील मँचेस्टर - ओसाका (जपान)
राजवाड्यांचे शहर - कोलकत्ता
लवंगांचे बेटा - झांजीबार
अट्रीयाटिक समुद्राची राणी - व्हेनिस (इटली)
सन्याशांचे साम्राज्य - कोरिया
युरोपचे क्रिडा मैदान - स्वीत्झलॅंड
जगाचे छप्पर - मध्य आशियातील पामीर
सारखेचे कोठार - क्युबा
सुवर्ण मंदिराचे शहर - अमृतसर
हिऱ्यांचे बंदर - कलकत्ता
गोऱ्याचे मानसाचे थडगे- गिनीचा किनारा(आफ्रिका)
उद्यानांचे शहर - शिकागो (अमेरिका)
भारताचे उद्यान - बंगलोर
मध्य रात्रीच्या सुर्याचे देश- नार्वे
कांगारुंचा देश - ऑस्ट्रेलिया
सरोवरांचा देश - स्कॉटलंड
मोत्यांचा देश - बहरीन
मंदिराचे माहेर - बनारस
संगमरवरी शहर - रोम
कमळांचे शहर - कॅनडा



## फिल्मी शब्दकोडे

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | | २ | | | ■ | ३ | ■ | ४ | ■ | ■ | ■ | ■ |
| | ■ | | ■ | ■ | ५ | | | | | ६ | | |
| ■ | ■ | ७ | | | | ■ | ■ | | ■ | | ■ | ■ |
| ८ | | | ■ | ■ | ■ | ■ | ■ | | ■ | ■ | ■ | ९ |
| | ■ | | ■ | १० | ■ | ■ | ११ | | | | | |
| | ■ | १२ | | | | | ■ | ■ | ■ | ■ | ■ | |
| | ■ | | ■ | | ■ | ■ | १३ | | ■ | १४ | | |
| | ■ | १५ | | | | ■ | | ■ | १६ | | ■ | ■ |
| ■ | १७ | ■ | ■ | ■ | ■ | १८ | | ■ | १९ | | | |
| २० | | | २१ | ■ | २२ | ■ | २३ | | | ■ | ■ | ■ |
| ■ | | ■ | | ■ | २४ | २५ | ■ | ■ | २६ | | | २७ |
| २८ | | ■ | २९ | | ■ | ३० | | ३१ | | ■ | ■ | |
| | ■ | ■ | ■ | ■ | ३२ | | ■ | | ■ | ३३ | | |

### आडवे संकेत

१) एक मशहूर हास्य अभिनेता. ५) सन् १९९४ में बनी फिल्म अंदाज अपना अपना के निर्देशक. ७) सन् १९९३ में डेब्लॉय डे के निर्देशन में बनी इस फिल्म में सलमान खान और श्रीदेवी थे. ८) अनिल कपूर, माधूरी दीक्षीत, जैकी श्रॉफ और नाना पाटेकर अभिनीत फिल्म. ११) सन् १९९६ में बनी फिल्म मि. बेचारा का हिरो.
१२) सन् १९८७ में बनी मरते दम तक इस फिल्म के संगीतकार.
१३) XX आप हमारे होते (फिल्म)
१४) सन् १९९३ में कल्पना लाजमी के निर्देशन में बनी इस फिल्म में राज बब्बर और डिम्पल कपाडिया थे. १५) ए.आर.XXXX (संगीतकार) १६) सन् १९९९ में बनी इस फिल्म में आफताब शिवदासानी और उर्मिला मातोंडकर थे. १८) XX बख्तीयार (नायीका) १९) ले तो आये हो हमे सपनों की गाव में प्यार की छांव में बिठाये रखना..... यह गाना इस गायीका ने गाया है. २०) सन् २००० में आदित्य चोपडा के निर्देशन में बनी इस फिल्म में अमिताभ बच्चन, शाहरुख खान और ऐश्वर्या रॉय थे. २३) XXX देव (खलनायक,सहनायक) २४) XX पास (धर्मेंद्र अभिनीत फिल्म) २६) ईन्साफ का मंदीर है ये XXXX का घर है... २८) सन् २००० में निर्देशक मन्सूर खान की इस फिल्म में शाहरुख खान, चंद्रचुड सिंह और शरद कपूर थे. २९) आनंद XX (गीतकार) ३०) दिल है के मानता नही इस फिल्म की नायीका. ३२) होगी प्यार की XX (फिल्म) ३३) सन् १९८९ में निर्माता निर्देशक राज खोसला की इस फिल्म में ऋषी कपूर और फरहा थे.

### उभे संकेत

१) XX जानी जनार्दन (फिल्म) २) सन् १९७३ में बनी फिल्म अनहोनी की हिरोईन. ३) सन् २००२ में बनी इस फिल्म में दिनु मोरीया, बिपाशा बासू और आशुतोष राणा थे. ४) सन् १९८१ में बनी फिल्म कुदरत की हिरोईन. ५) करण अर्जून इस फिल्म में सलमान खान और शाहरुख खान की माँ कौन थी. ६) सन् १९५५ में बनी झनक झनक पायल बाजे इस फिल्म की हिरोईन. ८) तहलका इस फिल्म में नसिरुद्दीन शाह की हिरोईन. ९) XXXX बाहरवाली (फिल्म) १०) सन् १९९२ में बनी फिल्म बेटा के निर्देशक. १३) निर्देशक राकेश रोशन की इस फिल्म में अनिल कपूर, ऋषी कपूर और जुही चावला थे. १४) छूपा XXX (फिल्म) १६) सन् १९९९ में बनी फिल्म कारतूस के निर्देशक. १७) XXXX बहल (नायक) २१) सन् १९८८ में निर्माता निर्देशक २२) जिंदगी एक XX (फिल्म)
२५) इस फिल्म में अक्षय कुमार, करीश्मा कपूर, सुनील शेट्टी और सोनाली बेंद्रे थे. २७) सन् १९९८ में निर्देशक कीर्ती कुमार की इस फिल्म में गोविंदा और ममता कुलकर्णी थे. २८) XX का गुलाम (फिल्म) ३१) जसपाल XX (हास्य कलाकार)

### मागील फिल्मी उत्तर

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जा | गृ | ती | ■ | म | स्त | ■ | जु | ड | वा | ■ | शु | ■ |
| न | ■ | ■ | म | हा | ■ | ■ | दा | ■ | ■ | का | ल | का |
| म | न | मो | ह | न | दे | सा | ई | ■ | डे | ■ | ■ | श |
| स | ■ | ह | ल | ■ | व | ■ | ■ | ■ | वी | ■ | ■ | आ |
| म | ■ | रा | ■ | सु | र | ज | ■ | स | ड | क | छा | प |
| झा | ■ | ■ | ■ | या | ■ | ■ | ध | ■ | ध | न | ■ | ह |
| क | ■ | ■ | ■ | ■ | दो | ■ | र | ■ | व | ■ | हे | मा |
| रो | टी | क | प | डा | औ | र | म | का | न | ■ | ■ | रे |
| ■ | रा | म | ■ | ■ | र | ■ | ■ | नु | ■ | ■ | ■ | हो |
| सी | मा | ■ | जि | ने | दो | ■ | ■ | न | गी | ना | ■ | ते |
| ■ | रा | ■ | ग | ■ | पां | ड | व | ■ | ■ | गे | ■ | ■ |
| अ | व | ता | र | ■ | च | ■ | जू | ■ | इ | श्व | र | ■ |
| क्स | ■ | ल | ■ | ■ | ■ | स | द | मा | ■ | र | ■ | ■ |

## विनोद



जंगल विभागाचा एक थापाड्या अधिकारी आपल्या डॉक्टर मित्राजवळ गप्पा मारत होता की, 'मी जंगली प्राण्यांना अजिबात घाबरत नाही. गेल्याच रात्री वाघ माझ्या छावणीत घुसला होता. मी चक्क त्याच्यावर थंड पाणी ओतले त्याबरोबर तो धूम ठोकून पळाला.'
यावर डॉ. मित्र म्हणाला, 'आपण सांगता ते अगदी खरं आहे. तो वाघ सर्दीने बेजार होऊन शिंका देत माझ्या शिबिरात आला होता. जेव्हा मी त्याच्या डोक्यावर हात ठेवला तेव्हा मला कळला की, तो खरोखरच ओलाचिंब झालेला होता.'

## चारोळी

मलाही वाटतं झोपाळ्यावर
अलगद झुलावं
तू व्हाव भ्रमर
अन मी फुलासारख फुलावं.

